
# डॉ. आयंदे यांना अपयश का आले ?



# माणूस

२२ सप्टेंबर १९७३ / पन्नास पैसे

श्री. ग. माजगावकर

२२ सप्टेंबर १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : सतरावा

## सप्रेम नमस्कार

◘ आपल्या लोकप्रिय 'माणूस'च्या दि. १ सप्टेंबरच्या अंकात शिरवली गावचे श्री. रमेश घरत यांनी 'पालघर—वसई तालुक्यातील खताचा गोंधळ' या श्री. पंढरीनाथ चौधरी यांच्या लेखावर मी केलेल्या खुलाशाला प्रतिखुलासा दिला आहे. तो वाचून आश्चर्य वाटले.

शिरवली गावच्या प्राथमिक शाळेची इमारत तीन खोल्यांची आहे. त्यात ७ वर्ग भरविले जातात. म्हणून ती अपुरी आहे, असा श्री. रमेश घरत याचा दावा आहे. परंतु शाळेची इमारत अपुरी म्हणविणाऱ्या श्री. रमेश घरत यांनी व त्याच्या काकांनी शाळची इमारत बांधताना लोकवर्गणीचा भाग म्हणून एक नया पैसा तरी दिला आहे का? नया पैसा लोकवर्गणी न देता ७ वर्गांच्या मानाने शाळेची इमारत अपुरी म्हणण्याचा नैतिक हक्क या महाभागाला कसा पोचतो? ७ व्या इयत्तेचा निकाल इतर शाळांच्या मानाने चांगला

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

असताना श्री. घरत यांनी घरभेद्याची भूमिका घेतली आहे, याचेही नवल वाटते. शाळेतील एका खोलीत ठेवण्यात आलेल्या खताबाबत कांगावा करताना जून महिन्याच्या मध्यावर खत ठेवण्यात आले, असे म्हटले आहे, ते खोटे आहे. त्यामुळे मुलांना पावसात भिजण्याचा प्रश्नच आला नाही. मागे मी म्हटल्या-प्रमाणे खताचा साठा सोईसाठी ग्राम-सेवकाच्या ताब्यात देण्यात आला. रात्री ८ वाजता आलेले खताचे ट्रक श्री. वामनराव भोईर यांनी मेहरबानीने दिलेल्या जागेत खाली करण्यात आले. त्यानंतर जागा नाही म्हणून शाळेच्या एका खोलीत खत ठेवले. केवळ शेत-कऱ्याच्या व ग्रामसेवकाच्या सोईसाठीच बी. डी. ओ. नी इतरत्र ठिकाणाप्रमाणे शिरवली गावी खताचा साठा ठेवला. यात माझी प्रतिष्ठा वाढविण्याचा कोण-त्याही प्रकारचा हेतू वा उद्देश नाही. ग्रामपंचायतीकडे असलेले १९ टन खत संपले असताना श्री. रमेश घरत यांनी अद्याप ९ टन संपले नसल्याची थाप मारली आहे.

शिरवली लिफ्ट इरिगेशन योजनेच्या बाबतीत श्री. पंढरीनाथ चौधरी यांनी यापूर्वी केलेल्या खोटारड्या लिखाणाची बाजू उचलून धरताना श्री. घरत यांनी म्हटले आहे की, अवर्षणाच्यावेळी माजिवली-दिपवली गावच्या शेतकऱ्यांना फायदा मिळाला नाही, हे खोटे आहे. अवर्षणाच्यावेळी नदीच्या बंधाऱ्यामुळे साठलेल्या पाण्याचा वापर वरील गावच्या (नदीकाठी जमीन असलेल्या) लोकांनी ऑईल इंजिनद्वारे केला. मात्र लिफ्ट इरिगेशन योजना शियवली गाव-चीच असल्यामुळे विजेच्या मोटार पंपाचे पाणी पाईपाद्वारे शिरवली गावाच्या बाजूच्या शेतीलाच मिळाले. नदीच्या एका कडेला पंपिंग घरात बसविलेल्या पंपाचे पाणी पलीकडे कसे जाईल? लिफ्ट इरिगेशनच्या पाण्याचा विटाच्या भट्टीसाठी वापर एका बड्या शेतकऱ्याने केला, हे साफ खोटे आहे. लिफ्ट इरिगे-शनच्या बंधाऱ्यात ज्यावेळी पाणी होते त्यावेळी १७ एकरात गव्हाचे पीक शेतकऱ्यांनी घेतले. त्यानंतर बंधाऱ्या-तील पाणी आटल्यानंतर म्हणजे एक महिन्याने श्री. रामचंद्र भोईर यांनी विटा घरासाठी पाडल्या. बंधाऱ्यात पाणी नसल्यामुळे त्यांनी नदीत खड्डा खोदून पाणी वापरले.

रघुनाथ बा. पाटील
सरपंच, शिरवली
ता. वसई

[या विषयावरील पत्रव्यवहाराला आता खाजगी स्वरूप प्राप्त होऊ लागल्याने हा विषय येथे थांबविला आहे. – सं. ]

# पुन्हा एकदा लेखनस्वातंत्र्य

श्री. ग. मा.

पुन्हा एकदा लेखनस्वातंत्र्याचा निःसंदिग्ध पुरस्कार करणे 'माणूस'ला आवश्यक वाटते. मागचा प्रसंग होता सखाराम बाईंडरवरील मोर्चाचा. नाट्यप्रयोग बळाने, धाकधपटशाने, मनगटशाहीने बंद पाडण्याचा. 'माणूस'ने पुण्याच्या बाल गंधर्व रंगमंदिराबाहेर घडलेल्या या प्रकाराचा व लिंगवाद निर्मूलन समितीच्या या मनगटवादाचा त्यावेळी निषेधच केला. आताचा प्रसंग आहे, 'महाराष्ट्रातील शिवाजी स्तोम' या 'रणांगण' पाक्षिकात प्रसिद्ध झालेल्या लेखाबद्दल लेखक प्रा. पंढरीनाथ रानडे यांच्याविरुद्ध उठलेल्या किंवा उठविण्यात आलेल्या प्रक्षोभाचा. औरंगाबादेतील प्रक्षुब्ध विद्यार्थ्यांनी निदर्शने वगैरे तर केलीच; पण पुढे जाऊन रानडे यांना नोकरीवरून काढून टाकण्यात यावे अशीही जोरदार मागणी त्यांनी केली आहे. पुण्यातूनही या मागणीला उचलून धरण्यात आले आहे. नाहीतरी लिंगवाद निर्मूलन समितीचे एक पाठिराखे, पुणे विद्यापीठाचे मराठीचे प्रमुख डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी ही काडी शिवाजी मंदिरातील आपल्या भाषणात त्यावेळी लावून दिलेलीच होती. डॉ. वाळिंबे यांनी भाषणाच्या ओघात तेव्हा सांगून टाकले होते, की सखाराम–घाशीराम अशा नाटकांना 'थोर' वगैरे म्हणणाऱ्या मंडळींना विद्यापीठात राहू द्यायचे की नाही, याचा विद्यार्थ्यांनी विचार करायची वेळ आलेली आहे. टाळ्या वगैरे या वाक्यावर पडल्या. तरी ही काडी तेव्हा तेथेच विझली. पण औरंगाबादेतील विद्यार्थ्यांनी ती आता पुन्हा पेटवण्याचे ठरविलेले दिसते. विद्यार्थी केवळ स्वयंप्रेरणेने हे करीत असतील तर त्यांच्याशी बोलून, चर्चा करून रानड्यांना व औरंगाबादेतील त्यांच्या मित्रपरिवाराला विद्यार्थ्यांचे मनपरिवर्तन करणे शक्य आहे. निदान तसा प्रयत्न तरी व्हायला हवा. पण विद्यार्थ्यांना पुढे करून काही क्षुद्र राजकारण यात खेळले जात असेल तर बौद्धिक चर्चेचा काहीही उपयोग नाही. रानडे विनाकारण बळी पडतील आणि विद्यापिठाच्या कारभारात एक अनिष्ट पायंडा रूढ होऊन जाईल. विद्यापिठातही मुक्त विचारविनिमयावर मतस्वातंत्र्यावर बंधने आणि दडपणे येऊ लागली तर इतर सर्व क्षेत्रातही ही लागण पसरेल व आपल्या बौद्धिक विकासाला हे फार मारक ठरेल. एकदम मान्य, की विद्यार्थ्यांचा व आपला बौद्धिक विकास साधण्याचा

अहर्निश प्रयत्न करणारी प्राध्यापक मंडळी अगदी थोडी, बोटावर मोजण्याइतकी आजकाल दिसतात. नोकरीतील बढती व सुस्थिती यांच्या मागे लागणारेच बहुसंख्येने आहेत. पण याला रानडे तरी एक अपवाद आहेत. अव्वल इंग्रजी आमदानीतील शेतकऱ्यांचे उठाव, प्राचीन महाराष्ट्र, महाराष्ट्रातील लेणी इत्यादी अनेक विषयांवर त्यांनी स्वतंत्र लिखाण आजवर केलेले आहे, परदेशातही ते वर्ष दोन वर्ष राहून, अभ्यास करून आलेले आहेत. ते मार्क्सवादी आहेत हे उघड आहे. पण हा काही गुन्हा नाही. शेकडो मार्क्सवादी प्राध्यापक मंडळी विद्यापिठातून असतात. कुणीच याला हरकत घेत नाही. मुद्दा आहे रानडे आपल्या व्यवसायाशी कितपत प्रामाणिक आहेत हा. ही बाजू जर बळकट असेल, विद्यार्थ्यांना नेमून दिलेले विषय व्यवस्थित शिकवणे, आपलाही बौद्धिक विकास साधणे यात जर रानडे कुठे कमी पडत नसतील तर त्यांच्या एखाद्या मताबद्दल, लेखाबद्दल त्यांना धारेवर धरणे, त्यांची नोकरी काढून घेणे हा रानड्यांवर चक्क अन्याय आहे. रानड्यांच्या मताशी सहमत नसलेली मंडळीही हा अन्याय त्यांच्यावर होऊ नये असेच म्हणतील. कारण अजूनतरी हा देश लोकशाही अस्तित्वात असलेला देश आहे. येथे विचारस्वातंत्र्य भरपूर आहे. विचार वेगळे, स्वतंत्र म्हणून फार तर येथे माणसे एकाकी पडतात, पण त्यांचा छळ होत नाही. म्हणून असे वाटते की रानडे प्रकरण थोडक्यावरच मिटेल, विवेकाची कास सोडली जाणार नाही, धाळिब्यांनी वर दिलेला सल्ला अव्हेरला जाईल.

¤

पण समजा असे घडले नाही तर रानड्यांसमोर पर्याय कोणता? सखाराम बाइंडरप्रकरणी दिग्दर्शक सारंग यांनी डळमळित भूमिका घेऊन स्वातंत्र्यवादी पाठिराख्यांची जशी कुचंबणा केली तशी रानडे करणार असतील तर स्वातंत्र्य हा केवळ एक पोकळ शब्द ठरेल. स्वातंत्र्य उपभोगायचे असेल तर वेळप्रसंगी, कसोटीच्या वेळी त्यासाठी काही मोलही देण्याची तयारी हवी. रानड्यांनी हे मोल देण्याची तयारी ठेवावी. आता हे प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. समजा न्यायालयात रानडे निर्दोष सुटले, पण विद्यापीठाने त्यांच्यावर कारवाई करून त्यांना अगोदरच कामावरून कमी केलेले असले, तर रानड्यांनीच मग विद्यापिठावर उलट चाल करून जायला हवे. अन्यायाची पुरेपूर भरपाई विद्यापिठाकडून वसूल केल्याशिवाय त्यांनी स्वस्थ बसू नये. याचा फायदा पुढिलांना होईल. गैरलागू कारणांसाठी एकट्यादुकट्या प्राध्यापकावर असा अन्याय सहसा होणार नाही. आपल्याकडील बुद्धिवंत लाचार आणि भेकड आहेत असा सर्वसाधारण समज आहे. हा समज खोटा ठरविण्याची एक संधी चालून आली असे मानून रानडे आल्या प्रसंगाला सामोरे जातील तर ती एक बहादुरीच ठरेल.

¤

याचा अर्थ रानड्यांच्या लेखातील

प्रतिपादन ' माणस 'ला मान्य आहे असा नाही. प्रकरण आता न्यायप्रविष्ट असल्याने त्याची चर्चा येथे अप्रस्तुत ठरेल; शिवाय तशी आवश्यकताही लेख वाचल्यावर वाटत नाही. लेख फार ठिसूळ आहे, मध्ययुगीन भारतीय वास्तवाकडे त्यात पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. पण हा विषय वेगळा. चुकीचे असले तरी आपले मत मांडण्याचा या देशात प्रत्येकाला अधिकार आहे, असला पाहिजे. नाहीतर रशिया-चीन हे साम्यवादी देश आणि लोकशाही असलेला भारत यात फरक तो काय उरला ? ● ● ●

---

दैनिक मराठवाडा, औरंगाबाद : दि. १६ सप्टेंबर अंकावरून ,...

# मुख्यमंत्रीप्रकरणी प्रा. तुंगार यांना घेराव व मारहाण

नांदेड दि. १५—नांदेड येथील यशवंत महाविद्यालयाचे एक प्राध्यापक देवदत्त तुंगार यांना गुरुवारी यशवत महाविद्यालयाच्या सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांनी घेराव करून तुंगार यांनी प्राध्यापकपदाचा राजीनामा द्यावा किंवा वार्ताहरपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

दि. २७ ऑगस्ट १९७३ च्या साप्ताहिक ' प्रतिभा 'मध्ये मुख्यमंत्रीप्रकरणात ' प्रा. तुंगारांची प्रतिक्रिया ' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या बातमीबाबत त्यांनी माफी मागावी, अशी मागणी केली. कारण मराठवाड्यास मुख्यमंत्रीपद मिळावे म्हणून मराठवाड्यातून मागणी होत असताना तुंगारांनी ना. मधुकरराव चौधरी मुख्यमंत्री व्हावेत, अशी प्रतिक्रिया व्यक्त करून त्यांनी मराठवाड्याचा द्रोह केला, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे होते.

विद्यार्थ्यांनी प्रा. देवदत्त तुंगार यांना सकाळी १० वाजता घेराव घातला तो दुपारी १ वाजेपर्यंत चालूच होता. काही विद्यार्थ्यांनी तुंगारांना धक्काबुक्कीही केल्याचे कळते. मराठवाडाद्रोही तुंगारांनी प्राध्यापकपदाचा राजीनामा द्यावा व त्यांनी झालेल्या प्रकाराबाबत माफी मागावी, अशी विद्यार्थ्यांनी मागणी केली. पण तुंगारांनी माफी मागण्यास नकार दिल्यामुळे विद्यार्थी चिडले व वातावरण तंग झाले. काही विद्यार्थ्यांनी या वेळेपर्यंत एक गाढवही तेथे आणले. परिस्थिती आणखी चिघळणार एवढ्यात महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. गो. रा. म्हैसेकर तेथे आले व पोलिसही पोचले.

प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला तेव्हा तुंगारांचा राजीनामा आधी घ्या, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. शेवटी प्राचार्यांनी आपण ८ दिवसात निर्णय देऊ असे आश्वासन दिल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपला घेराव उठविला. पण तुंगारांच्या निषेधार्थ नंतरही विद्यार्थी वर्गात गेले नाहीत.

आठ दिवसात प्रा. तुंगारांना कॉलेजमधून काढण्याचा निर्णय कॉलेजच्या शिक्षण समितीने न घेतल्यास विद्यार्थी पुन्हा आंदोलन करतील, असा इशारा दिला आहे. □

# चिली

## लोकशाही समाजवादाचे अपयश

### वा. दा. रानडे

चिलीमध्ये लष्करी क्रांती होऊन मार्क्सवादी अध्यक्ष डॉ. साल्व्हाडोर आयेंदे (आयेंदे हाच उच्चार बरोबर आहे. अॅलेंडे चुकीचा आहे) यांना पदच्युत करण्यात आले. त्यांनी आत्महत्या केली की अध्यक्ष प्रासादातील लढाईत त्यांना ठार करण्यात आले याबद्दल परस्परविरोधी बातम्या असल्या तरी चिलीमधील लष्करी क्रांती यशस्वी झाली असून तेथील कम्युनिस्ट सत्तेचा अस्त झाला आहे असे दृश्य आज तरी दिसते.

डॉ. आयेंदे हे लोकशाही मार्गाने निवडून येऊन देशातील सर्वोच्च सत्तापद मिळविलेले जगातील पहिले मार्क्सवादी अध्यक्ष. पण ते ज्या पद्धतीने निवडून आले त्यातच त्यांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सर्वात जास्त मते (३६ टक्के) त्यांना पडली हे खरे पण बहुसंख्य मतदार त्यांच्या विरुद्ध होते. जवळ जवळ ६४ टक्के मते विरोधी उमेदवारांना मिळाली पण ती विभागली गेल्याने डॉ. आयेंदे यांचा विजय झाला. त्यांच्या निवडीस काँग्रेसची मान्यता मिळविण्यासाठी विरोधी ख्रिश्चन डेमोक्रॅट पक्षाशी त्यांना तडजोड करावी लागली. आयेंदे यांनी सुद्धा डाव्या पक्षांची संयुक्त आघाडी (पॉप्युलर युनिटी अलायन्स) स्थापून सरकार बनविले, पण पार्लमेंटच्या दोन्ही गृहात विरोधी पक्षांचे बहुमत होते. चेंबर ऑफ डेप्युटीजमध्ये अध्यक्षांच्या आघाडीचे फक्त ५७ प्रतिनिधी होते तर विरोधी पक्षांचे ९१ होते. सिनेटमध्ये आयेंदे यांच्या आघाडीचे २४ तर विरोधी पक्षांचे २७ सभासद होते. तीन वर्षांनी म्हणजे मार्च १९७३ मध्ये पार्लमेंटच्या निवडणुका झाल्या. त्यात आयेंदे यांच्या आघाडीने आपल्या जागा थोड्या वाढविल्या पण बहुमत विरोधकांचेच कायम राहिले. या निवडणुकीत चेंबर ऑफ डेप्युटीजमध्ये आयेंदे यांच्या आघाडीस ६२ तर विरोधकांना ८८ जागा मिळाल्या.

सिनेटमध्ये ही संख्या अनुक्रमे २० व ३० अशी होती. अशा परिस्थितीत अध्यक्ष विरुद्ध पार्लमेंट हा संघर्ष अटळ होता. चिलीच्या घटनेप्रमाण अध्यक्षांविरुद्ध अविश्वासाचा ठराव पास करून त्याला अधिकारावरून दूर करण्यासाठी दोन तृतियांश बहुमताने ठराव पास व्हावा लागतो. तेवढे बहुमत विरोधी पक्षांच्या मागे नव्हते. मार्च १९७३ मध्ये झालेल्या निवडणुकात आपण दोन तृतीयांश बहुमत मिळवू अशी आशा विरोधी पक्षांना वाटत होती, पण ती सफल झाली नाही. त्यामुळे निवडणुकीनंतरही संघर्ष व पेचप्रसंग कायम राहिला.

'आपले सरकार समाजवादी असणार नाही किंवा कम्युनिस्टही असणार नाही. पण चिलीमधील भावी समाजवादी राज्याचा पाया ते घालील' असे अध्यक्ष आयेंदे यांनी ३ नोव्हेंबर १९७० ला आपल्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर पहिल्याच भाषणात जाहीर केले.

आयेंदे यांची कम्युनिस्ट राजवट आणि इतर देशातील कम्युनिस्ट राजवटी यात एक मोठा फरक होता. इतर कम्युनिस्ट देशात हुकूमशाही राजवटी होत्या तर चिलीमध्ये लोकशाही होती. डॉ. आयेंदे घटनेनुसार झालेल्या निवडणुकात विजयी होऊन अध्यक्ष झाले होते. घटनात्मक व लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद आणण्याचे अवघड कार्य त्यांना करावयाचे होते. तीन वर्षाच्या काळात त्यांनी ते उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टिने कसोशीने प्रयत्न केला यात शंका नाही. चिलीची जनता घटनानिष्ठ आहे असे म्हणण्यापेक्षा कायदानिष्ठ आहे असे म्हणणे अधिक बरोबर होईल. तुमचे उद्देश साधण्यासाठी कायदा तुम्ही जास्तीत जास्त मर्यादेपर्यंत हवा तसा वाकवा पण तो तुम्हाला मोडता येणार नाही असे चिलीचे घटनातज्ज्ञ म्हणतात. अध्यक्ष आयेंदे यांनी ही मर्यादा कसोशीने पाळण्याचा प्रयत्न केला. अधिकारपदाच्या पहिल्या सव्वा वर्षात कायद्याचे उल्लंघन न करता राष्ट्रीय उत्पादनाचा साठ टक्के भाग आपल्या नियंत्रणाखाली आणण्यात त्यांच्या सरकारने यश मिळविले. आपल्या अध्यक्षीय मुदतीच्या काळात म्हणजे १९७६ पर्यंत ७० ते ८० टक्के उत्पादन सरकारी नियंत्रणाखाली आणण्याचे आयेंदे यांचे उद्दिष्ट होते. एका बाजूला श्रीमंत जमीनदार, उद्योगपती व व्यापारी वर्ग आणि दुसऱ्या बाजूला भूमिहीन मजूर आणि शहरातील झोपडपट्ट्यात राहणारे लाखो लोक यांच्यातील विषमतेची मोठी दरी त्यांना दूर करावयची होती. ग्रामीण भागातील दारिद्र्य दूर करण्याच्या बाबतीत त्यांनी बरीच प्रगती केली. १७५ एकरापेक्षा मोठी असलेली सर्व बागायती शेते सरकारने ताब्यात घेऊन गरीब शेतकरी व शेतमजुरांना जमिनी दिल्या. जमीन सुधारणांचा कार्यक्रम अंमलात आणताना रशियात लाखो जमीनदारांची कत्तल झाली. चिलीमध्ये अध्यक्ष आयेंदे यांनी या सुधारणा शांततापूर्ण मार्गाने घडवून आणल्या.

ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्ष सत्तारूढ असताना राष्ट्रीय उत्पन्नात सहा वर्षात ३·१ टक्के वाढ झाली होती. पण डॉ. आयेंदे अधिकारावर येताच १९७१ मध्ये उत्पन्नात ८·५ टक्के वाढ झाली. बेकारी ८·८ टक्क्यावरून ३·७ टक्क्यापर्यंत घटली.

याप्रमाणे प्रगती करूनही डॉ. आयेंदे यांना अपयश का आले? एका कारणाचा उल्लेख वर केलाच आहे. आपली धोरणे अंमलात आणताना व निर्णय घेताना विरोधी पक्षाचे बहुमत असलेल्या कॉंग्रेसशी त्यांना सतत संघर्ष करावा लागला. नोकरशाहीची पुनर्घटना त्यांनी केली नाही. पक्षपातीपणा, दप्तरदिरंगाई, संधिसाधुपणा, दूरदर्शीपणाचा अभाव, स्वार्थ आणि उधळपट्टी हे दोष असलेल्या नोकरशाहीने अध्यक्षांच्या समाजवादी निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारली नाही. चलनवाढीने जागतिक उच्चांक गाठला. वस्तूंच्या किमती वर्षात ३२० टक्के वाढल्या. सरकारने उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले पण अंमलबजावणी जुन्या नोकरशाहीकडेच सोपविण्याने उत्पादनात अपेक्षेप्रमाणे वाढ झाली नाही. परदेशी व्यापारात प्रतिकूल तफावत वाढत गेली. परदेशी चलनाचा साठा महिन्याला २२० लाख डॉलर या प्रमाणात घटत गेला. अमेरिकन मालकीच्या तांब्याच्या खाणीचे राष्ट्रीयीकरण सरकारने केले पण राष्ट्रियीकरण होताच अमेरिकन कंपन्यांनी मोठ्या पगारावर नेमलेले जर्मन तंत्रज्ञ व काही देशी तंत्रज्ञही दुसरीकडे निघून गेले. त्यामुळे खाणीचे उत्पादन वाढविण्यासाठी तंत्रज्ञांची टंचाई सरकारला मोठ्या प्रमाणात जाणवली. अमेरिकन कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण होताच अमेरिकेने चिलीविरोधी धोरण स्वीकारून चिलीला द्यावयाच्या आर्थिक मदतीत मोठ्या प्रमाणावर कपात केली. अमेरिकेच्या नियंत्रणाखालील कर्जाची रक्कम अठरा महिन्यात २२ कोट डॉलरवरून २ कोटी ६० लाख डॉलरपर्यंत घटली. अमेरिकेने मदत थांबविली एवढेच नव्हे तर चिलीच्या तांब्याची परदेशात निर्यात रोखण्यासाठी परदेशावरही दडपण आणले. रशिया व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांकडून मदत मिळाली पण परदेशी व्यापारातील तूट भरून काढण्यास आणि चलनवाढ रोखण्यास ती पुरेशी नव्हती. जमीन सुधारणामुळे गरीब शेतकऱ्यांची व शेतमजुरांची परिस्थिती सुधारली. त्यांच्या हातात अधिक पैसा खेळू लागला. ते अधिक धान्य खरेदी करू लागले पण त्यांची वाढती मागणी सरकार पुरवू शकले नाही. शेती उत्पादन १९७२ मध्ये ८ टक्के घटले. याचवेळी जागतिक बाजारपेठेत धान्याचे भाव वाढल्याने परदेशातूनही सरकार फारसे धान्य खरेदी करू शकले नाही. त्यामुळे टंचाई, चलनवाढ, काळाबाजार या गोष्टी वाढतच गेल्या.

डॉ. साल्व्हाडोर आयेंदे गोसेन्स यांना १९७० साली अध्यक्षपदी निवडून चिलीच्या जनतेने त्यांना लोकशाहीच्या

मार्गाने समाजवाद आणण्याची संधी दिली. घटनेच्या व कायद्याच्या चौकटीत राहून जास्तीत जास्त समाजवाद आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण त्यांच्याच सत्तारूढ आघाडीतील कट्टर डावे गट आणि विरोधी पक्षातील कट्टर उजवे गट यांनी या प्रयोगाशी सहकार्य केले नाही. लोकशाही मार्गाने समाजवाद आणावयाचा म्हणजे लांब पल्ल्याचा कार्यक्रम आखावा लागतो. तेवढी संधी आयेंदे यांना मिळाली नाही.

आयेंदे समाजवादी पक्षाचे प्रमुख होते. १९५२ पासून चारवेळा त्यांनी अध्यक्षीय निवडणूक लढविली व अखेर १९७० साली विजयी झाले. आयेंदे डॉक्टर होते. डॉक्टरांनी राजकारणात भाग घेण्याची दक्षिण अमेरिकेत परंपराच आहे. त्यांचा समाजवादी पक्ष मार्क्सवादी तत्त्वांचा पुरस्कार करीत असला तरी अराज्यवादी, ट्रॉट्स्कीवादी आणि साधे क्रांतिकारक राष्ट्रवादी यांनाही पक्षात प्रवेश आहे.

आयेंदे यांनी आपले पहिले राजकीय भाषण वयाच्या सतराव्या वर्षी पित्याच्या दफन विधीचे प्रसंगी केले. उत्साही व चैतन्यपूर्ण व्यक्तिमत्वाचा हा नेता मताने मार्क्सवादी असला तरी दिसायला एखाद्या भांडवलदारी नेत्यासारखा दिसे. कम्युनिस्ट हुकूमशाही त्यांना नको होती, पण कम्युनिस्टांशी पूर्ण सहकार्य करण्याच्या बाजूचे ते होते. आघाडीत कम्युनिस्टांना आपण काबूत ठेवू शकू असा आत्मविश्वास त्यांना वाटत असे.

चिलीमधील लष्करी क्रांतीशी अमेरिकेचा काही संबंध असल्याचा इन्कार अमेरिकन सरकारने अधिकृतपणे केला असला तरी त्याबद्दल शंका येण्यासारख्या घटना घडलेल्या आहेत. डॉ. आयेंदे अध्यक्षपदी येऊ नयेत यासाठी इंटरनॅशनल टेलिफोन अँड टेलिग्राफ कॉर्पोरेशनने कसे प्रयत्न केले यासंबंधीची कागदपत्रे अमेरिकन स्तंभलेखक जॅक अँडरसन यांनी प्रसिद्ध केली आहेत. चिलीतील अमेरिकन वकील नॅथॅनिअल डेव्हिस ७ सप्टेंबरला म्हणजे लष्करी उठावाच्या चार दिवस आधी अचानक वॉशिंग्टनला गेले व उठावाच्या थोडे आधी सांवियागोस परत आले. डेव्हिसच्या भेटीचा लष्करी बंडाशी काही संबंध नाही असे अमेरिकन सरकारने कितीही सांगितले तरी या घटनेचे पूर्वीच्या एका घटनेशी असलेले साम्य निरीक्षकांच्या लक्षात आल्याशिवाय राहिले नाही.

दक्षिण व्हिएटनामचे अध्यक्ष गो दिन्ह दिएम यांच्याविरुद्ध उठाव झाला त्यापूर्वी तेथील अमेरिकन वकील हेन्री कॅबट लॉज यांनी वॉशिंग्टनला अचानक भेट दिली होती. दिएमच्या पदच्युतीचा कट सी. आय. ए. या अमेरिकन गुप्तहेर संघटनेने घडवून आणला होता हे आता उघड झालेले आहे. तेव्हा चिलीतील लष्करी उठावामागेही सी. आय. ए.चा हात नसेलच असे खात्रीपूर्वक सांगता येत नाही. इंटरनॅशनल अँड टेलिग्राफ कॉर्पोरेशनच्या हालचालींचा उल्लेख वर केलाच आहे. चिलीमध्ये आर्थिक गोंधळ निर्माण करावा, तेथे मोठ्या

प्रमाणावर अराजक निर्माण करावे म्हणजे आता आपण हस्तक्षेप करून सुव्यवस्था प्रस्थापित केली पाहिजे अशी तेथील लष्कराची खात्री होईल असा सल्ला या कंपनीचे उपाध्यक्ष विल्यम मेरियम यांनी व्हाइट हाऊसला दोन वर्षापूर्वी दिला होता. डॉ. आयेंदे अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी ऑक्टोबर १९७० मध्ये चिलीचे सरसेनानी जनरल रेने स्नेडर यांचा खून झाला होता. त्यामागे वरील कंपनीच्या हालचाली असल्याचा आरोप अध्यक्ष आयेंदे यांनीच केलेला होता. या सर्व घडामोडी अमेरिका चिलीतील आयेंदे-विरोधी हालचालींपासून पूर्णपणे अलिप्त होती असे खास दर्शवीत नाहीत.

चिलीमध्ये ११ सप्टेंबरला झालेला लष्करी उठाव हा काही अगदी अचानक झालेला उठाव नव्हता. २९ जूनला लष्कराच्या एका विभागाने अध्यक्ष आयेंदे यांच्या निवासस्थानावर हल्ला केला होता. ते त्यावेळी तेथे नव्हते. हा उठाव लागलीच मोडून काढण्यात आला. देशात आणीबाणीची परिस्थिती जाहीर करण्यात आली. त्यानंतर ८ ऑगस्टला दोन युद्धनौकांवर कटाचा प्रयत्न झाला तोही मोडून काढण्यात आला. ११ सप्टेंबरला झालेल्या मोठ्या लष्करी उठावाच्या त्या पूर्वसूचना होत्या.

लष्कर काही प्रथमपासून आयेंदे-विरोधी नव्हते. राजकारणात हस्तक्षेप करावयाचा नाही अशी चिलीच्या लष्कराची परंपरा आहे. दक्षिण अमेरिकेतील इतर देशांच्या मानाने चिलीत फारच थोडे लष्करी उठाव झालेले आहेत. तीन सेनानींना मंत्रिमंडळात घेऊन लष्कराचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न आयेंदे यांनी केला, पण लष्करातही आयेंदे यांच्या बाजूचे व त्यांच्या विरोधी असे दोन तट पडले, त्यापैकी विरोधी गटाने अखेर लष्करी उठाव केला.

विरोधी पक्षांना डॉ. आयेंदे यांची कम्युनिस्ट राजवट नको असली तरी लष्करी उठावाला त्यांचा पाठिंबा होता असे म्हणता येणार नाही. ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टी हा चिलीमधील प्रमुख विरोधी पक्ष. त्या पक्षाचे एक नेते सिनेटर फ्युटीलबा यांनी लष्करी उठावाला विरोध दर्शविला होता. 'कोणत्याही प्रकारच्या उठावाच्या प्रयत्नांना आमच्या पक्षाचा विरोध आहे व अशा उठावातून स्थापन झालेल्या सरकारला आम्ही विरोध करू.' पण सर्वच विरोधी पक्षांचे असे धोरण नव्हते. कट्टर उजव्या गटांना लष्करी उठाव हवा होता. ख्रिश्चन डेमोक्रॅटिक-पक्ष अधिकारावर येण्यापूर्वी या गटांच्या हाती सत्ता होती. राष्ट्रियीकरणाने ज्यांचे हितसंबंध धोक्यात आले अशा वर्गांचाही त्यांना पाठिंबा होता. नऊ महिन्यांच्या काळात दोनदा लॉरी मालकांचा संप घडवून आणून त्यांनी अर्थव्यवस्था विस्कळीत केली होती. लष्करी उठावाला अनुकूल परिस्थिती निर्माण करावी हाच त्यामागे उद्देश होता.

डॉ. आयेंदे लोकशाही मार्गाने निवडणुकीत विजयी होऊन अध्यक्ष झाले. त्याच मार्गाने म्हणजे १९७६ च्या निवडणुकीत त्यांच्या आघाडीचा पराभव करून त्यांना अधिकारावरून दूर करणे हा खरा-लोकशाही मार्ग पण तो अवलंबण्याची कट्टर उजव्या गटांची तयारी नव्हती. कारण निवडणुकात ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाचा उमेदवार अध्यक्षपदी निवडून येईल आणि आयेंदे सरकारने पहिल्या वर्षी घडवून आणलेले बहुतेक बदल तो कायम ठेवील अशी भीती त्यांना वाटत होती.

## चिलीच्या अपयशाचा धडा

चिलीतील लष्करी क्रांतीने समाजवादी चळवळीच्या दृष्टीने काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. लोकशाही मार्गाने समाजवाद आणणे कितपत शक्य आहे हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न. लोकशाही मार्गाने प्रस्थापित झालेले सरकार लष्करी क्रांतीने उलथले जाणार असेल तर समाजवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचा लोकशाही मार्गावर ठाम विश्वास बसणे कठीण आहे. लोकशाही मार्गाने समाजवाद आणता येत नाही. त्यासाठी सशस्त्र क्रांतीचाच अवलंब केला पाहिजे अशी प्रवृत्ती चिलीमधील अपयशातून वळावू लागेल. लोकशाही समाजवादाचा प्रयोग यशस्वी होण्यासाठी लोकशाहीवर सर्वांचीच श्रद्धा हवी. सत्तारूढ पक्षाची हवी तशीच विरोधी पक्ष आणि लष्कराचीही हवी. यापैकी एखाद्या घटकाने जरी लोकशाही मार्ग सोडला तरी हा प्रयोग अयशस्वी होतो. हा चिलीतील घटनांचा धडा आहे.

चिलीतील अपयशाने लोकशाही समाजवाद्यांनी निराश होण्याचे कारण नाही. चिलीतील प्रयोगातल्या चुका टाळून लोकशाही समाजवादी चळवळीची उभारणी केली पाहिजे. भारताचे नेतेही लोकशाही समाजवादाची भाषा बोलतात पण आपल्याकडे खऱ्या अर्थाने लोकशाहीही अस्तित्वात नाही आणि समाजवादही अस्तित्वात नाही. आहेत नुसते शब्द. लोकशाही समाजवाद ही खडतर यात्रा आहे. केवळ सरकारी पातळीवर कायदे करून लोकशाही समाजवाद आणता येणार नाही. जनतेत सतत कार्य करून लोकशाही समाजवादाची मूल्ये रुजविली पाहिजेत. जनतेची एकदा या मूल्यांवर श्रद्धा बसली की तिच्या सहकार्याने सरकार हा कार्यक्रम यशस्वीपणे अंमलात आणू शकेल. लष्करी उठावाचे प्रयत्न होणार नाहीत आणि झाले तरी फार काळ टिकणार नाहीत. भांडवलशाही आणि कम्युनिस्ट हुकूमशाही यातून निर्माण होणाऱ्या विकृती टाळण्याचा लोकशाही समाजवाद हाच एक मार्ग जगापुढे आहे.

चिलीतील लष्करी क्रांती आज तात्पुरती यशस्वी झाली असली तरी जनतेचा प्रविचार चालूच राहील. जनतेचे प्रश्न लष्करी नेते सोडवू शकणार नाहीत. डाव्या चळवळीला तात्पुरती पिछेहाट पत्करावी लागली असली तरी पूर्वीच्या चुका सुधारून चळवळीची उभारणी झाल्यास डाव्या चळवळीचे सामर्थ्य निश्चित वाढेल. ● ●

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## पाहुण्यांनी धमाल उडवली !

प्रथम सुरुवात झाली तीच एका अनपेक्षित पण आपुलकीने भरलेल्या पत्राने ! आजवर केवळ पत्रानेच औपचारिक संबंध असलेल्या सौ. निर्मला पुरंदरे यांचे ते पत्र होते. सात फ्रेंच पाहुणे, मी व सौ. इंदुताई टिळक इतकी मंडळी बांगला देशला जाण्याच्या उद्देशाने कलकत्त्याला ता. १५ ऑगस्ट रोजी पोहोचतो आहोत... स्टेशनवर भेट होईल ना ?–हा पत्राचा मुख्य आशय. याशिवाय त्या मंडळींच्या कलकत्त्यातील वास्तव्याची व त्यांच्यासाठी कार्यक्रम आखण्याची जबाबदारीही सूचित केलेली होती. त्यांची इच्छा बंगाली कुटुंबामधून राहून ते जीवन जवळून बघावे अशी होती, पण इतक्या तातडीने ते जमणे अशक्य होते. कारण येणारांना नसली तरी आम्हाला पूर्ण कल्पना होती की बंगाली लोक तसे reserved असतात. सहसा कुणाला चटकन घरात घेणारच नाहीत, पण एकदा त्यांनी घरात घेतलेच तर त्या पाहुण्याला घरचाच बनवून टाकतील, मग बाहेर जाऊच देणार नाहीत. म्हणून पाहुण्यांची व्यवस्था महाराष्ट्र निवासात केली आणि निर्मलाताईंचे, आमचे घर ते महाराष्ट्र निवास अशा चकरा मारणे सुरू झाले.

पाहुण्यांचा शांतिनिकेतनचा एक कार्यक्रम ठरलेलाच होता. कलकत्त्यातील दोन-तीन दिवसांच्या वास्तव्यात त्यांना भरपूर कार्यक्रम हवे होते. त्या कार्यक्रमांचे आराखडे मनाशी योजणे सुरू झाले. कलकत्त्यातील सर्वसाधारण प्रवासी मंडळींसाठी असलेली प्रेक्षणीय स्थळे बघण्यात त्यांना रस नव्हता हे आम्ही एकूण माहितीवरून ताडले होते. तरीपण शक्य झाल्यास त्यांना रामकृष्णांच्या बेलूर मठात घेऊन जावे असा एक बेत आम्ही आखला. कारण आमच्या कलकत्त्याजवळ परदेशी जनांना सुबकता आणि सुव्यवस्था ह्या दृष्टीने आल्हादकारक वाटण्याजोगी एवढीच पुंजी आहे. व्हिक्टोरिया मेमोरियल किंवा पुराणवस्तुसंग्रहालय त्यांना आवडणे शक्यच नव्हते. (अलीकडे म्युझियमची नवी व्याख्या a collection of dead things अशी केली जाते.) एक विचार मात्र निश्चित झाला–ह्या पाहुण्यांना दोन तऱ्हेचे श्रेष्ठ कलाकार दाखवायचे. एक समाजाच्या दृष्टीने अगदीच क्षुल्लक, अप्रतिष्ठित जीवन जगणारे, पिढ्यान्‌पिढ्या धर्म, परंपरा आणि कलेचे संरक्षण करीत आलेले मूर्तिकार ! एवढ्या मोठ्या महानगरीत ह्या लोकांचे स्वतःचेच असे एक

विश्व आहे त्याला कुम्हारटोली म्हणतात. ह्या कुम्हारटोलीतून हिंडताना आपण कलकत्त्यात आहोत हेच मुळी विसरायला होते. एकापेक्षा एक कलात्मक मूर्ती घडवणे, त्या रंगविणे ह्यातच वर्षाचे बाराही महिने व्यग्र असलेली, ओळीने झोपडीवजा घरातून राहणारी ती कुटुंबे ! अगदी कोवळ्या वयापासूनच हात नि डोळे कलेमध्ये प्रवीण होत असतात सतत त्याच वातावरणात वावरत असल्याकारणाने. आणि त्यांच्यातही specialization कोर्सेस आहेत. कुणी कच्चे सांगाडे बनवितो. (ह्यासाठी धानाचे गवत वापरतात. वर मातीचे लेप लावतात. त्यामुळे मूर्ती कितीही मोठी असली तरी हलकी असते.) कुणी मुखवटे बनवतो. कुणी नुसते रंग तयार करतो तर कुणी मूर्ती रंगवण्याचे काम करतो. एखादा eye-specialist प्रत्येक मूर्तीची नजर जणू सजीव करून जातो. एखादा वस्त्र-आभूषणे-अलंकार ह्यांचाच दर्दी असतो. हे सारे तेथे बिनबोभाट चाललेले असते. आमच्या परदेशी पाहुण्यांना येथे खचित नवीनता आढळून येईल असा आमचा विश्वास होता. आणि झालेही तसेच. ही सर्व मंडळी हा विभाग बघताना तहानभूक विसरली की !

कलाकाराचा एक नमुना हा झाला. दुसरा श्रेष्ठ दर्जाचा कलाकार दाखवावासा वाटला तो सत्यजित राय. प्रतिष्ठित जीवन जगणारा, ही महानगरी पडद्यावर दाखवून प्रेक्षकांची वाहवा मिळवणारा, कांचनगंगा नंतर अगदी परवाच 'आशानी शंकेत' (coming thunder) ह्या उत्कृष्ट कलाकृतीस बर्लिन फिल्म फेस्टिव्हलमध्ये अत्युच्च पारितोषिक (Golden bear) मिळवणारा, जगभर प्रसिद्धी पावलेला दिग्दर्शक ! परंतु सत्यजित रायला गाठणे कुम्हारटोलीतून हिंडून येण्याइतके सहज सोपे नाही. हे बहुधा जमणार नाही असे गृहीत धरून आणखी एकदोन कार्यक्रम आखले. त्यात उल्लेख करण्याजोगा एक म्हणजे महाराष्ट्र मंडळात एक चर्चा घडवून आणायची. त्यात निवडक बंगाली व महाराष्ट्रीय बुद्धीमान मंडळींना भाग घेण्यास बोलवायचे नि परस्पर प्रश्नोत्तरे ह्याच पातळीवर चर्चेची आखणी करायची.

१५ तारीख उजाडली. स्टेशनवर गाडीची वाट बघण्यात चार तास खर्च झाले तेव्हा सुरुवात ही अशी होतेय, पुढचे निभणार कसे ह्या विचाराने मन अस्वस्थ झाले. पण पाहुणे मंडळींनी फलाटावर पाय ठेवले मात्र नि सारे कसे व्यवस्थित घडून आले अगदी ठरवल्यासारखे! त्याच दिवशी महाराष्ट्र मंडळात त्यांचा परिचय करून देण्यात आला. वास्तविक पाहुणे मंडळी प्रवासाने थकली होती; मंडळाचे सभासदही वक्तृत्व स्पर्धेची भाषणे सतत चार-पाच तास ऐकून कंटाळली होती. त्यानंतरच हा परिचयाचा कार्यक्रम होऊ शकला. त्यावेळी रात्रीचे दहा वाजले होते. सर्वांच्याच सहनशीलतेची ही एक कसोटी होती. पण कुणाच्याही चेहऱ्यावर नापसंतीची रेषा उमटली नाही.

निर्मलाताईंनी छोटेसे भाषण केले. इथे येण्याचा उद्देश, बांगला देशला जाण्याचा उद्देश, ज्या संस्थेत ही मंडळी काम करतात तिची रूपरेषा इ. थोडक्यात सांगितले. त्यानंतर पाहुणे आपापल्या खोलीत गेले. जेवणेही नंतरच झाली.

कार्यक्रमांचे बाबतीत बांधलेले आमचे आराखडे बहुतांशी जुळून आले. बदल एकच झाला. पाहुण्यांनी बेलूर मठाच्या स्वच्छ सुंदर वातावरणाऐवजी सभोवती घाणेरडे वातावरण पांघरून बसलेल्या कालीदेवीच्या दर्शनाचा कार्यक्रम जाहीर केला. इतकेच नव्हे, तेथे जाऊन संपूर्ण आरती होईपर्यंत वेळ काढला, तीर्थप्रसाद घेतला नि मगच तेथून बाहेर पडले.

आल्याआल्या बांगला देशचा व्हिसा मिळवणे व तिकीट बुक करणे यातच एक पूर्ण दिवस खर्च झाला. लगेच मंडळी शांतिनिकेतनला निघून गेली. 'आम्ही येतो तोवर पुढच्या दोन दिवसांच्या कार्यक्रमांची तयारी करून ठेवालच' असे म्हणून निर्मलाताईही पसार झाल्या. मग आमची धावपळ सुरू झाली. कुणाला प्रत्यक्ष भेटून सांग, तर कुणाला फोन करून चर्चेसाठी अवश्य या म्हणून आमंत्रणे दे हे सुरू झाले. मराठी समाजातील मंडळी बोलावण्याचे काम मंडळाच्या अध्यक्षांनी स्वतः स्वीकारले. वेळ निश्चित झाली. शांतिनिकेतन पाहून पाहुणे मंडळीही वेळेवर परत आली. आणि रात्री आठ ते साडेअकरापर्यंत बैठक झाली. पण चर्चेला तसा विशेष रंग चढला नाही. तशी ती अगदीच कंटाळवाणीही झाली नाही. प्रश्नोत्तरे कासवाच्या गतीने पुढे सरकत होती. कारण सारे काही ऐन वेळेवर ठरले होते. अगोदरपासून विचार करायला कुणालाच सवड मिळाली नव्हती.

दुसऱ्या दिवसासाठी श्री. सत्यजित राय यांची कच्ची अपॉइंटमेंट घेतली होती. फक्त अर्धा तास द्यायला ते तयार होते. आणि घरात एवढ्या लोकांनी गर्दी करावी हे त्यांना पसंत नव्हते. 'खास इंटरव्ह्यू' देण्यासही ते नाकबूल होते. ता. १० ला सकाळी पुन्हा फोन करायला त्यांनी सांगितले. मला मनातून वाटले, बहुतेक ऐनवेळी हे गृहस्थ नाही म्हणणार...पण त्याला इलाज नव्हता! ठरल्यावेळी फोन केला. त्यांच्या सूचनांप्रमाणेच सांगितले की आम्ही चारजण येऊ...इंटरव्ह्यू नाही... फक्त अर्धा तास बोलू... आपली गैरसोय करणार नाही. त्यांनी एकदम म्हटले, ठीक आहे. साडेपाचला या.

सायंकाळी ठीक साडेपाचला आम्ही चार-पाच मंडळी – फ्रेंच पाहुण्यांचे नेतृत्व करणारी मारीवोन्न लाँदोर्मी, निर्मलाताई पुरंदरे, आम्ही उभयता आणि एक विद्यार्थी – फोटोग्राफर अतनु रायचौधरी त्यांचे घरी पोचलो. मारीवोन्न आणि सत्यजित राय या दोघांचे संभाषण रंगले. मधून निर्मला-ताईही भाग घेत होत्या. आम्हाला बोलण्याचे विशेष कारण नव्हतेच. तुमच्याच फिल्मस् घेऊन पॅरिसमध्ये

एक फिल्म फेस्टिव्हल घडवून आणण्यासाठी काय करावे असे मारीवोन्नने त्यांना विचारले. ते म्हणाले, तिथे कुणीतरी डिस्ट्रिब्यूटर असल्याखेरीज ते शक्य नाही. ती म्हणाली, तशी तिथे व्यवस्थाच नाही. मी स्वतंत्रपणे असे केले तर–

सत्यजित राय म्हणाले– तसे शक्य होणार नाही. कारण भारत सरकारचाच ह्या विचारसरणीस विरोध राहील. तिने कबूल केले की फ्रान्समध्ये अशी कोणतीच संस्था नाही जी भारतीय चित्रपट बोलावून ते दाखवण्याचा खर्च करण्यास तयार असेल. सत्यजितचे पाथेर पांचाली पाहिल्यानंतर तिला व तिच्या इतर मित्रमंडळींना फार विस्मय वाटला होता. कारण फ्रान्समध्ये फ्रेंच दिग्दर्शकाने Oh ! Calcutta नावाची फिल्म तयार केलेली त्यांनी पाहिली होती. त्यात कलकत्त्याचे हिडीस स्वरूपच फक्त दाखवले होते. व ते पाहून ह्या लोकांना चीड आली होती. सत्यजित रायदेखील म्हणाले, तो चित्रपट म्हणजे त्या दिग्दर्शकाचा मूर्खपणाच होय. सत्यजितच्या फिल्म्स् पॅरिसमध्ये दाखवून Oh ! calcutta ने निर्माण केलेले चुकीचे इम्प्रेशन पुसून टाकावे हाच तिचा एकमेव उद्देश होता आणि तो सफल होण्याची चिन्हे तिला दिसत नव्हती.

सत्यजित तसे फार गंभीर प्रवृत्तीचे ! पण जरा विनोद निर्माण झाला की खळखळून हसणारे ! बोलताना अनेकदा भावपूर्ण अभिनय करतात.

त्यांनी मारीवोन्नला सिगरेट देऊ केली. त्याचवेळी तिने 'तुम्हाला फ्रेंच सिगरेट आवडेल ?' असे विचारले. ते म्हणाले–नको, नको. फ्रेंच सिगरेट्स् फार स्ट्राँग असतात, आणि तिची सिगरेट पेटवून देण्यास ते चटकन उठून तिच्याजवळ आले.

घरी धुतलेला पांढरा स्वच्छ पैजामा आणि झब्बा ह्याच वेषात ते राहतात. त्यांनी कोल्ड्रिंक पाजले ते अगदीच सामान्य–हॉटेल टाईप काचेच्या पेल्यांमधून. साध्या गोष्टींना दिखाऊपणाचा मुलामा ते चढवू इच्छित नाहीत. पण त्यांची पुस्तकांनी भरलेली कपाटे पाहून मारीवोन्न देखील थक्क झाली. 'तुमची खोली म्हणजे खऱ्या अर्थाने Living-room आहे' असा शेरा मारल्याविना तिला राहवले नाही.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे श्री. सत्यजित राय आपल्याला फक्त सिनेदिग्दर्शक म्हणूनच माहीत आहेत. त्यांचे इतर गुण आपल्याला अज्ञात आहेत. ते स्वतः चांगल्यापैकी चित्रे काढतात पुस्तके लिहितात आणि 'संदेश' नामक पाक्षिक चालवतात केवळ लहान मुलांसाठी ! संदेशच्या ऑफिसमध्ये ते जातीने हजर राहतात. स्वतःच्या पुस्तकांमध्ये त्यांनी स्वतःच रेखाचित्रे काढलेली आहेत. स्वतःला सतत कामात व्यस्त ठेवणारा श्रेष्ठ दर्जाचा दिग्दर्शक अन्यत्र क्वचितच आढळेल.

सत्यजितचे वडील आणि आजोबा दोघेही उच्च दर्जाचे लेखक–ज्यांनी खास मुलांसाठीच पुस्तके लिहिली.

सत्यजितने त्यांची परंपरा पुढे चालवली आहे. इतकेच नव्हे, आजोबांच्या एका बालकथेवरून त्यांनी एक सुंदर चित्रपट तयार केला जो बघण्यास लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत असलेल्या आम्ही पाहिल्या.

वेळेची मर्यादा संपली म्हणून आम्ही उठलो. रायबाबूंचा निरोप घेतला. ह्या अवधीत अतनुने त्यांची अनेक सुंदर छायाचित्रें टिपली. इथे अतनुचीही थोडीशी ओळख करून द्यावीशी वाटते. हा मेडिकल सायन्सचा ३ ऱ्या वर्षाचा विद्यार्थी. फोटोग्राफीचा केवळ छंद. पण ती कला त्याने इतकी आत्मसात केली की कोणीही त्याची छायाचित्रे बघून खूष व्हावे! खुद्द सत्यजित राय यांना नंतर त्याने सारे फोटो दाखवले. ते स्वत: फार खूष झाले. अतनुला म्हणाले शक्य झाल्यास शूटिंगच्या वेळी तू माझ्याबरोबर राहा, मी तुला बोलावीन. मुलगा स्मार्ट आहे. त्याला माहिती पुष्कळ आहे. आपल्या व्यक्तिमत्वाची तो सहज छाप पाडू शकतो. विशेष म्हणजे तो पराक्रमी आहे. १९६८ साली एका बुडणाऱ्या मुलाला वाचवले या कारणास्तव 'धाडसी कुमार' म्हणून देण्यात येणारे सुवर्णपदक त्याने मिळवले होते. मानखुर्दच्या मेळाव्याला गेल्यावर्षी तो निमंत्रीत पाहुणा होता. पु. लं. च्या हस्ते इतर कुमारांसमवेत यानेही मानपत्र स्वीकारले होते, याचाही गौरव करण्यात आला होता.

मारीवोन्न लाँदोर्मीच्या आग्रहास्तव कॉलेजस्ट्रीट मार्केट दाखवून आणण्याची जबाबदारी अतनुनेच स्वीकारली होती. तिथे फिरताना आपण पॅरिसमधील पुस्तकांच्या बाजारातूनच जणू हिंडतो आहोत असा मारीवोन्नला भास झाला. काली मंदिर, कुम्हारटाली व कॉलेजस्ट्रीट मार्केट पाहिले तेव्हा खरा कलकत्ता पाहिल्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर झळकलेला दिसला.

येथील वास्तव्यात बंगाली कुटुंबात राहण्याचे बाबतीत पाहुण्यांचा हिरमोड झाला तसा खास बंगाली हॉटेलचे बाबतीतही झाला. 'आम्हाला खास बंगाली खाना खायचा आहे' असा मारीवोन्नने हट्टच धरला तेव्हा माझी पंचाईत झाली. खास बंगाली हॉटेल मला एकही माहीत नव्हते. कुणाला विचारले तर नीट माहिती मिळत नव्हती. टॅक्सीवाल्यालाच मग मी म्हटले – एखाद्या 'परिष्कार' (स्वच्छ) बंगाली हॉटेलात आम्हाला घेऊन चल. त्याने कुठे नेले असेल? आमच्याच घराच्या जवळपासच्या एका गल्लीत एका अंधाऱ्या घरवजा हॉटेलपाशी. त्या हॉटेलची बाहेरून सूरत पाहूनच अंगावर शहारे आले. मग आम्ही एका निराळ्याच हॉटेलात जेवण घेतले. पाहुण्यांची एवढी साधी इच्छा आपण पूर्ण करू शकलो नाही याची मला मनातून खंत वाटली.

त्यानंतर अतनुबरोबर कॉलेजस्ट्रीट मार्केट पाहून आल्यानंतर त्यालाही तिने हेच विचारले. तो म्हणाला – खास बंगाली खाना बंगाली घर सोडून तुम्हाला दुसरीकडे कुठेही मिळणार नाही! त्या दिवशी ह्या पाहुण्यांमुळे मलाही नव्यानेच एक शोध लागला आणि तोही वर्षानुवर्षे इथे राहिल्यानंतर – अन् तो म्हणजे साऱ्या कलकत्यात खास बंगाली जेवण देणारे एकही हॉटेल नाही!

● ● ●

# सो ल क ढी

## सेवा करा; वर कर भरा

मी चाकरीदार मनुष्य आहे. (नोकरी आणि चाकरी हे एकाच अर्थाचे शब्द असले तरी नोकरी या अर्थाने चाकरी हाच शब्द वापरणे मी नेहमी पसंत करतो; कारण चाकरी शब्दातून जो सेवाभाव सूचित होतो तो नोकरी शब्दातून होत नाही.) या चाकरीतून मिळणाऱ्या वार्षिक मिळकतीपैकी काही हिस्सा, आयकराच्या रूपाने, मी राष्ट्राच्या उभारणीसाठी सरकारच्या स्वाधीन करीत असतो. हे मी आपखुशीने करतो असे बिलकूल नव्हे; पण पगारच आयकर कापून हातात आला तर तुम्ही काय करणार? पण पगार ही काही माझ्या उत्पन्नाची एकमेव बाब नाही. याचे साधे कारण असे आहे की चाकरी एवढी एकच गोष्ट मी करतो असे नाही. चाकरीशिवाय 'सोलकढी' हे विलक्षण लोकप्रिय सदर मी लिहितो: आता देवयानी चौबळच्या 'चंदेरी च्युइंगम' या सदरामुळे जसे 'साप्ताहिक मनोहर' चालते तसे 'साप्ताहिक माणूस' माझ्या 'सोलकढी' या सदरामुळे चालते, ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहे. ही गोष्ट 'माणूस'च्या संपादकांनासुद्धा अर्धवट ठाऊक असावी. त्यामुळे मी इतर जातिवंत लेखकांप्रमाणेच राहवत नाही म्हणून लिहीत असूनसुद्धा 'माणूस'वाले मला मानधन देतात. या मानधनाची आणि इतरही मिळकतीची माहिती मी वेळच्या वेळी आयकरखात्याला कळवायला हवी अशी एक जबाबदार नागरिक म्हणून माझ्याकडून शासनाची अपेक्षा आहे. पण एकवेळ हवा तेवढा आयकर भरणे सोपे आहे; पण ते मिळकतीचे माहितीपत्रक भरणे नको. त्यातल्या कित्येक गोष्टींचा मला साफ बोधच होत नाही. एस. टी. च्या मोठ्या मध्यवर्ती स्थानकावर सामान्य प्रवाशाची व्हावी तशी माझी अवस्था ते वाचताना होते. म्हणून मी त्या भानगडीत पडत नाही. पण माझे काही मित्र मात्र त्यातले दर्दी आहेत. एखादी कविता वाचावी आणि तिचे रहस्योद्ग्राही विश्लेषण करावे तितक्या चवीने ते, ते माहितीपत्रक वाचून अचूक भरतात. एखादा अनवट राग ऐकल्यासारखी आनंदाची गुंगी त्यांना चढते. मला त्यांच्या एका गोष्टीचे विशेष कौतुक वाटते: त्यांच्याकडून आयकराचा जादा भरणा कधीही होत नाही. आयकरदात्याला उपलब्ध असणाऱ्या बारीकसारीक, खऱ्या-खोट्या सवलतीचा पुरेपूर उपयोग ते करून घेतात. त्यांची फार पक्की माहिती या मंडळींना असते.

पण या मंडळींनासुद्धा माहीत नसेल अशा सवलतीची एक कथा येथे सांगा-

यची आहे. 'द एप्रिल गेम' या, अमेरिकेतील एका कर-विशारदाने लिहिलेल्या पुस्तकात ही कथा नमूद केली आहे. एक अविवाहित माणूस असतो. माझ्यासारखाच चाकरीदार असतो. माझ्यासारखीच थोडी बाहेरची मिळकत त्याला असते. येथे माझ्याशी असलेले त्याचे सारखेपण संपते. मिळकतीच्या माहितीपत्रकात, 'औषधपाण्या'वर खर्च झालेल्या ६०० डॉलर्सवर तो करमाफी चाहतो. अमेरिकन कर-खाते त्याची करमाफीची मागणी मान्य करते. या माणसाचे औषधपाणी जरा आगळेच होते. म्हणजे असे की एका मानसोपचारतज्ज्ञाने या अविवाहित माणसाला त्याच्या व्याधींवर अक्सीर उपाय म्हणून त्याला वेश्येकडे पाठवले होते! तज्ज्ञाचा सल्ला शिरोधार्य मानून हा करदाता एका उपयुक्त आणि उपाययुक्त वेश्येकडे गेला. तिने पुरवलेल्या रुग्णोपयोगी सेवेबद्दल याने तिला ६०० डॉलर्स दिले; आणि पुढे याच ६०० डॉलर्सवर त्या पठ्ठ्याने करखात्याकडून करमाफी मिळवली.

करमाफी देताना अमेरिक करखात्याने त्या परिचारिकी वेश्येच्या अस्तित्वाबद्दल आणि तिने या रुग्णाला दिलेल्या व्याधिनिवारण औषधपाण्याबद्दल खात्री करून घेतली. आणि मग पुढे तिच्यावर ९०,००० डॉलर्सचा कर बुडवल्याबद्दल दावा लावला: एकूण तिची 'प्रॅक्टीस' फार चांगली चालत असली पाहिजे.

इंग्लंडमध्ये 'द एप्रिल गेम' हे पुस्तक फार काळजीपूर्वक वाचले जात आहे: लॉर्ड लॅबटन-जेलिकोसारख्या उमरावी पुरुषांना वर उद्धृत केलेले करमाफीचे प्रकरण फार उद्बोधक वाटत असून नॉर्मा लेव्हीसारख्या सेवाभावी पण्यांगनांची मात्र त्यामुळे झोप उडाली आहे.

वैद्यकशास्त्र केवढे पुढे गेले आहे आणि करशास्त्र आता मागासलेले कसे राहिले नाही, एवढ्या दोन गोष्टी माझ्यापुरत्या मी लक्षात ठेवल्या आहेत. ●

## आम्हीच असे कमनशिबी कसे!

प्रत्येक राष्ट्र जीव लाऊन कोणता ना कोणतातरी खेळ खेळत असते. तो खेळ खेळला नाही तर सबंध राष्ट्राच्या राष्ट्राला बद्धकोष्ठ होईल, अशी भीती वाटत असावी. रशिया बुद्धिबळे आणि अमेरिका फुटबॉल खेळण्यात गढून जाते. क्रिकेट आणि राणीचे कौतुक या दोन खेळात ब्रिटन गुंग असते. 'शिवाजी म्हणतो'—सारखा 'माओ म्हणतो' हा चीनचा अधिकृत खेळ आहे. (पाकिस्तानला खेळ खळायला अजून पुरेशी सवड मिळत नाही.) भारत आणि आपण भारतभूचे पुत्र 'लोकशाही लोकशाही' नावाचा फार मजेदार खेळ अटीतटीने खेळत असतो.

या 'लोकशाही' खेळात आपण सर्वस्व इरेला लावले असल्याने भिकार-सावकार, आंधळी कोशिंबीर, लंगडी, खोखो, टेबल टेनिस, टेनिस, बॅडमिंटन,

फुटबॉल, क्रिकेट, हॉकी यासारख्या सर्वसामान्य खेळांकडे चांगले लक्ष द्यायला आपल्याला फुरसत नाही. म्हणजे तसे हे खेळ आम्ही खेळतो; त्यांचा दर्जा सुधारावा यासाठी कितीतरी मंडळे आणि आयोग निर्माण करतो; प्रसंगी लोकांच्या तोंडचे अन्न काढून खेळ आणि खेळाडू मानाने जगवण्यात आम्ही प्रयत्नशील असतो. पण हे सारे आम्ही कर्तव्यबुद्धीने करतो; लोकशाहीमध्ये कर्तव्य केलेच पाहिजे या श्रद्धेने करतो.

कारण हे सर्वसामान्य खेळ खेळायचे तर त्यात कायम आपलाच विजय झाला पाहिजे, असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते. हॉकीत, काही वर्षांपूर्वीपर्यंत, आम्हाला प्रतिस्पर्धी नव्हता. तेव्हा आम्ही खूष होतो. आता सगळ्याच खेळात स्पर्धा फार वाढली आहे. त्याचेही फारसे काही वाटले नसते. पण खेळ आम्हाला धार्जिणे नाहीत असा आमचा अनुभव आहे. खेळात नुसते कौशल्य उपयोगी पडत नाही; तेथे पाठराखणीला नशीब हवे. आमच्यापाशी कौशल्य हवे तेवढे आहे; नशिबाने मात्र आमची पुन्हा पुन: गोची केली आहे.

काही दिवसांपूर्वी आमच्या शालेय क्रिकेट संघाने ब्रिटनचा छोटा दौरा केला. या दौऱ्यावर बहुतेक सामन्यात आपण मार खाल्ला. याआधी गेलेल्या शालेय संघाने बहुतेक सामने जिंकले असल्याने या वेळीही विजय आपल्यालाच मिळायला हवा होता. बरे, आपले खेळाडू वाईट खेळले म्हणावे तर तसे नाही; इंग्लिश शालेय खेळाडू आपल्यापेक्षा चांगले खेळले म्हणावे तर तसेही नाही. मग झाले काय? या संघाबरोबर मार्गदर्शक आणि व्यवस्थापक म्हणून गेलेल्या विजय मांजरेकरच्या मते बेटे नशीबच आपल्याला अनुकूल नव्हते. नुकत्याच संपलेल्या विश्वचषक हॉकीस्पर्धातील अंतिम सामन्यात हॉलंडने भारताला हरवले. तेव्हासुद्धा खेळ आमचाच चांगला झाला होता; पण अधिकारी म्हणतात त्यावरून असे दिसते की नशीब लेकाचे हॉलंडचाच कैवार घेत होते. यंदाच्या विंबल्डन टेनिस स्पर्धेत तरी दुसरे काय झाले? जॉन कोडेस विरुद्ध विजय अमृतराज असा सामना चालला होता. विजयासाठी अमृतराजला एक विजयी खेळी हवी होती. पण नतद्रष्ट नशीब कोडेसला फितुर होते. त्यामुळे विजय पराभूत झाला आणि जॉन कोडेसने तो सामना आणि पुढे विंबल्डनचे अजिंक्यपद मिळवले. (स्वत: विजय अमृतराज नशिबाला दोष देत नाही. तो म्हणतो : सामना जिंकायला एक विजयी खेळी हवी आहे असे ध्यानात येताच माझ्या डोक्यात अनेक विचारांनी गर्दी केली. अचानक उपांत्य फेरीतील प्रवेशाची शक्यता दिसल्याने त्या दडपणामुळे माझे चित्त विचलित झाले! अर्थात विजय अमृतराजपेक्षा इतरांचेच मत अधिक बरोबर असणार. त्यानुसार हा सगळा नशिबाचा खेळ होता.)

नशिबाचा खेळ होतो पण आमचा जीव जातो. हे नशीब इतके पक्षपाती

आहे की ज्या ज्या वेळी आम्ही विजयी होतो तेव्हासुद्धा ते प्रतिपक्षाच्याच मागे रेंगाळत असते. ●

## नॉर्मा ला दूस

मुंबईत सध्या 'इर्मा ला दूस' या या फ्रेंच नावाचा एक इंग्रजी चित्रपट तुफान लोकप्रिय झाला आहे. या चित्रपटात इर्मा नावाची एक खट्याळ वेश्या, एक बेकार पोलीस आणि एक धनाढ्य उमराव यांची चटकदार प्रेमकहाणी मोठ्या वेधक रीतीने दाखवली आहे. बेकार पोलीस आणि धनाढ्य उमराव या दोन व्यक्ती नाहीत एवढे सांगितले, आणि शर्ले मॅक्लेन व जॅक लेमन यांच्या प्रमुख भूमिका असून बिली वाइल्डरचे दिग्दर्शन आहे एवढे सांगितले म्हणजे त्या चित्रपटाचा स्वभाव तुमच्या लक्षात येईल. (येथे मी त्या चित्रपटाची कथा सांगितली असती आणि धंदेवाईक पद्धतीने त्याचे गुणदोष सांगितले असते तर मला कोण अडवणार होते? पण मग, असल्या फालतू मोहाला मी बळी पडत नाही, हे मला सांगता आले नसते.)

या चित्रपटकथेचे स्मरण व्हायला वर्तमानपत्रात नुकतीच आलेली एक बातमी कारणीभूत आहे. तुम्हाला ती नॉर्मा लेव्ही आठवते का? हे आपले उगाच विचारायचे म्हणून. तुम्हाला ती आणि तिच्याबद्दलचा सगळा तपशील नक्कीच आठवत असणार. असो. गेल्या वर्षी या नॉर्मा लेव्हीच्या लफड्यात अडकल्यामुळे लॉर्ड लॅंबटन आणि लॉर्ड जेलिको या उमरावांना आपली मंत्रिपदे सोडावी लागली होती. नॉर्मा लेव्हीला मात्र काहीच सोडावे लागले नव्हते.

उलट मिळालेल्या धमाल प्रसिद्धीमुळे तिने सरळ एक पुस्तक लिहायला घेतले. 'मी : नॉर्मा लेव्ही' असे त्या पुस्तकाचे नाव असून ते ऑक्टोबर महिन्यात प्रसिद्ध होईल. (मी धोरणीपणाने त्या पुस्तकाची प्रत आगाऊ नोंदवून ठेवली आहे.) नॉर्मा लेव्ही म्हणते की ब्रिटिश परराष्ट्रखाते ब्रिटनला भेट देणाऱ्या बड्या पाहुण्यांना अधिकृत रीत्या वेश्या पुरवते : एका वेश्येने एक रात्र काम केल्यास तिला चाळीस पौंड मिळतात. इंडोनेशियाचे एके काळचे सर्वेसर्वा डॉ. सुकार्नो यांची अशी सेवा आपण केली आहे, असे नॉर्मा अभिमानाने सांगते.

डॉ. सुकार्नो ब्रिटनला कधी आलेच नव्हते असे परराष्ट्रखाते म्हणते. किंबहुना नॉर्माची कथा बरीचशी खोटी आहे, असे परराष्ट्रखात्याचे मत आहे.

खऱ्याखोट्याची चिकित्सा करायला येथे वेळ कोणाला आहे. कथा चटकदार असली की झाले. आणि नॉर्मा ला दूस (ला दूस म्हणजे सुंदरा) व कोणी धनाढ्य उमराव किंवा तत्सम कोणीतरी यांची कथा चटकदार न व्हायला काय झाले? शिवाय जेथे चटकदारपणा अंमळ कमी पडेल तेथे स्वतःच बिली वाईल्डर बनून आपण कल्पनेने तो घालू शकत नाही काय? ● ● ●

# कुट्टनाडमधील शेतमजूर युनियन

चंद्रशेखर मराठे

ब्रिटनमधील निग्रो कामगार-चळवळीच्या एक नेत्या श्रीमती अलथिया जोन्स यांनी शोषणाच्या प्रक्रियेवर नुकतेच एक मार्मिक भाष्य केले. टाईम्स वीकली (९-९-७३) मधील एका मुलाखतीत त्या म्हणाल्या 'प्रत्येक ठिकाणच्या शोषणाचे इंगित हे असते की आपण शक्तिहीन आहोत हे शोषितांनी मान्य केलेले असते. ही शक्तिहीनतेची भावना दूर करणे हे आमच्या चळवळीचे ध्येय आहे. श्रीमती जोन्स यांनी जो विचार मांडला आहे त्याचीच प्रचिती कोठल्याही प्रकारच्या शोषितांमध्ये जागरणाचे, उत्थानाचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना वारंवार येत असते.

कामगार, स्त्री, दलित या तीन शोषितांच्या शोषणाचे मूळ त्यांच्या शक्तिहीनतेच्या भावनेतच असते. आपल्या समाजरचनेमध्ये धार्मिक, सामाजिक, नैतिक अशा अनेक पदरी संकेतांच्या जाळ्यांमध्ये शोषित वर्गास इतकी वर्षे असे काही घट्टपणे बांधून टाकले आहे, की त्यांना काहीही हाल-चाल करता येऊ नये. या वर्गास जे दुय्यम प्रकारचे जिणे जगावे लागत आले आहे त्यामुळे त्यांच्या मनात नैसर्गिक कनिष्ठपणाची भावना अतिशय मूळ धरून बसली आहे. स्त्री व दलित यांच्या मुक्तीचा लढा आपल्या येथे खऱ्या अर्थाने सुरूच झालेला नाही. कामगार-श्रमिकांच्या मुक्तीचा लढा काही प्रमाणात गेली ७५ वर्षे सुरू आहे व तो प्रामुख्याने आर्थिक क्षेत्रातच आहे.

कामगार चळवळीचे प्रमुख हत्यार संघटना हे राहिले आहे. संघटनेच्या हत्याराच्या बऱ्यावाईट उपयोगाने औद्योगिक क्षेत्रातील कामगारांची अवस्था आर्थिक दृष्ट्या फार थोडी सुधारली असली तरी सामाजिक न्यूनगंडाचे उच्चाटन करण्यात कामगार चळवळीस यश मिळाले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. संघटना या हत्याराचा उपयोग दलित व स्त्री यांच्या मुक्ती लढ्यात तितक्या प्रमाणावर करणे अद्याप शक्य झालेले नाही. कारण संघटनात्मक दबाव हा आर्थिक स्वरूपाच्या संबंधांतच (जसे मालक-कामगार) उपयोगी पडतो.

औद्योगिक कामगार चळवळीने संघ

टनेचे शास्त्र व प्रतिकाराचे मार्ग या बाबत बरीच प्रगती करण्या बरोबरच बिगर औद्योगिक कामगारांमध्येही सुधारणेची आकांक्षा निर्माण करण्यात थोडेफार यश मिळवले आहे. शोषितांमधील सर्वात अधिक शोषित, दरिद्री, असुरक्षित, असंघटित व दबलेला असा जो शेतमजुरांचा वर्ग त्यामध्येही कामगार चळवळीच्या धर्तीवर चळवळ तुरळक प्रमाणात सुरू झाली आहे. शेतमजुरांच्या चळवळीचे औद्योगिक कामगार चळवळीशी कोणते नाते आहे, या दोन चळवळींमधील साम्यविरोध कोणता, औद्योगिक क्षेत्रातील चळवळीचे मार्ग ग्रामीण भागात कितपत उपयोगी पडतात हा या पुढील काळात एक अभ्यासनीय विषय ठरणार आहे. सध्या अशा प्रकारचे काही अभ्यास उपलब्ध होत आहेत. के. सी. अलेक्झांडर यांनी इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली या साप्ताहिकात (२५ ऑगस्ट १९७३) या विषयी नुकतेच काही निष्कर्ष प्रसिद्ध केले आहेत. ते ग्रामीण चळवळीत कार्य करणारांना, तिचा अभ्यास करणारांना बरेच उपयोगी पडतील.

श्री. अलेक्झांडर यांनी शेतकरी-शेतमजूर यांच्यातील बदलत्या संबंधांच्या आपल्या अभ्यासासाठी केरळमधील कुट्टनाड हा विभाग निवडला होता. या भागातील अलेप्पी व कोटायम ही गावे औद्योगिक व सामाजिक दृष्ट्या पुढारलेली आहेत. अलेप्पी हा जिल्हा डाव्या कम्युनिस्टांचे केरळमधील सर्वात मोठे शक्ति केंद्र असल्याचे मानले जाते. अलेप्पी मधील काथ्याच्या कारखान्यामधील मजुरांची संघटना कम्युनिस्टांनी प्रथम बांधली. काथ्या कारखान्यात नोकरी असणे हे या भागात मानाचे समजले जाते. काथ्या कामगारांचे राहणीमान हे येथील ग्रामीण शेतमजूर व गरीब यांना आदर्श (नॉर्मेटिव्ह रेफरन्स) वाटते. या कामगारांचा चळवळीने जो फायदा झाला, त्यामुळे कुट्टनाड भागातील शेतमजुरांना चळवळीबद्दल आकर्षण वाटू लागले. कुट्टनाडमधील प्रत्येक गावी डाव्या कम्युनिस्टांचे कार्यालय असून या भागातून आजवर डावे कम्युनिस्टच निवडून येत आले आहेत.

कुट्टनाडमध्ये भातशेती हा महत्त्वाचा उद्योग आहे. येथे साडेतीन लाख एकर जमीन भाताखाली असून पेरणी व कापणी या कामासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर शेतमजूर लागतात. कुट्टनाडमध्ये ९ टक्के लोक शेतकरी आहेत, ४९ टक्के शेतमजूर आहेत तर उरलेले ४२ टक्के लोक उद्योग व्यापार, नोकऱ्या यात आहेत.

कुट्टनाड हा भाग अत्यंत दाट लोकवस्तीचा आहे. कुट्टनाडमधील शेती ख्रिश्चनांच्या ताब्यात असून शेतमजूर हे बहुतेक खालच्या वर्गातील आहेत. कुट्टनाडमधील शेतमजुरांना स्वतःची राहण्याची घरे नसतात. ते शेतकऱ्यांच्या जमिनीतच झोपडी बांधून राहतात. बहुतेक शेतमजुरांचे वार्षिक उत्पन्न ५०० ते २५०० रु. असते. तर शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न १००० ते ५०००

रु. असते. शेतमजुरांना कायम स्वरूपाचे काम नसते. सरासरी पाहता त्यांना महिन्यातून १४ दिवस बेकार रहावे लागते. साक्षरतेचे प्रमाण या भागात फार आहे. शेतमजुरांपैकी ७८ टक्के पुरुष व ५६ टक्के स्त्रिया साक्षर आहेत. वर्तमानपत्रे विकत घेऊन वाचणारे शेतमजूर बरेच आहेत.

साक्षरता, कम्युनिस्टांचा प्रचार व वृत्तपत्रांचा वापर यामुळे या शेतमजुरांच्या आर्थिक अपेक्षा वाढत राहिल्या. अलेक्झांडर यांना पाहणीत असे आढळून आले, की शेतमजुरांचे सरासरी मासिक उत्पन्न ८३ रु. आहे व ते किमान मासिक २८६ रुपये व्हावे अशी त्यांची अपेक्षा आहे. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाने शेतमजुरांच्या व शेतकऱ्यांच्या विचारसरणीवर कितपत परिणाम झाला आहे याची पाहणी अलेक्झांडर यांनी एका प्रश्नावलीच्या सहाय्याने केली. त्यांना असे आढळून आले की जहाल विचारसरणी प्रामुख्याने शेतमजूर व विशेषतः खालच्या जातीचे शेतमजूर यांच्यात जास्त रुजली आहे. शेतकरी हे साधारण परंपरावादी असून मालमत्ता धारकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या केरळ काँग्रेसचे ते अनुयायी आहेत.

शेतमजुरांना युनियनचे आकर्षण वाटत होते तरी त्यांच्या चळवळीचा प्रत्यक्ष आरंभ एका दुष्काळामुळे झाला. दुसऱ्या महायुद्धात अन्नधान्याची टंचाई भासू लागली. सरकारने शेतमजुरांना, धान्याच्या रूपात मोबदला मिळतो. या कारणाने रेशनकार्डे दिली नाहीत. पण धान्याला बाजारात जास्त भाव येत असल्याने शेतमजुरांना धान्याच्या रुपात पगार देणे शेतकऱ्यांनी बंद केले. अशा अडचणीत असताना शेतमजुरांनी कम्युनिस्टांच्या हाकेला प्रतिसाद देऊन आपली युनियन स्थापली. त्रावणकोर शेतमजूर युनियन हे तिचे नाव. लौकरच ही युनियनची चळवळ कुट्टनाड भागात सर्वत्र पसरली. कम्युनिस्टांच्या वाढत्या चळवळी व १९५७ मध्ये राज्यात आलेली कम्युनिस्ट राजवट यामुळे युनियन बळकट होण्यास मदत झाली.

शेतमजूर विस्कळित स्वरूपाचे काम करीत असले तरी त्यांची युनियन ही खूपच बळकट व प्राधिनिधीक आहे युनियनमुळे आपल्या स्थितीत फरक पडला असे बहुसंख्य शेतमजुरांना वाटते. डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे कार्य व युनियन चळवळही खालच्या वर्गाच्या शेतमजुरांत जास्त लोकप्रिय आहे. युनियनच्या आदेशास सारे प्रतिसाद देतात. जे कोणी देत नाहीत त्यांच्यावर बलप्रयोग करण्यास युनियनचे कार्यकर्ते मागेपुढे पहात नाहीत. त्यामुळे कुट्टनाड भागात बरेचवेळा हिंसाचार उफाळून येतो. शेतमजुरांच्या युनियनला प्रत्युत्तर म्हणून कुट्टनाड कर्षक संघम ही संघटना काढली आहे. या संघटनेची सूत्रे केरळ काँग्रेसचे ठिकठिकाणचे पुढारी चालवतात. सरकारवर दडपण आणण्याबरोबरच 'संघम' आता अधिकाधिक प्रखर व प्रत्यक्ष मार्गांचा अवलंब करू लागला आहे. उदाहरणार्थ फेब्रुवारी ७१ मध्ये संघमने शेतीची कामे बंद ठवण्याचा

निर्णय घेतला होता. संघमचा आदेश न मानणाऱ्या शेतकऱ्यांचे पीक नष्ट करण्याचाही गुप्त निर्णय घेतला गेला होता.

१९५७ मध्ये शेतकरी-शेतमजूर यांचे संबंध नियंत्रित करण्यासाठी कुट्टनाड इंडस्ट्रियल रिलेशन्स कमिटी स्थापन करण्यात आली व तिचे अध्यक्ष उप-मजूरमंत्री होते. आपल्या राजवटीत कम्युनिस्टांनी शेतकरी-शेतमजूर यांच्या संघर्षात हस्तक्षेप न करण्याचे धोरण ठेवले होते. यामुळे कुट्टनाडमध्ये शेत-मजूर युनियनचे प्राबल्य वाढले.

युनियनचा उदय होण्यापूर्वी शेत-मजुरांचे पगार, पगाराची पद्धत, कामा-वर घेण्याची पद्धत, वगैरे सर्व गोष्टी केवळ शेतकऱ्यांच्या मर्जीवर ठरत असत. जातीव्यवस्थेचा प्रभाव असल्याने शेत-मजूर हे शेतकऱ्यांशी अत्यंत लाचारीने वागत असत. त्यांना स्वतःची घरे नसल्याने शेतकऱ्याशी वाद झाल्यास त्यांना घरातून हुसकावले जाई व शेत-कऱ्यांच्या हातात हे एक महत्त्वाचे अस्त्र होते. घरातून काढून लावण्याची पद्धत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर थोड्याच दिवसात बंद झाली. १९५७ पर्यंत अशी प्रथा होती की कापणीची मजुरी म्हणून शेतमजुरास त्याने कापलेल्या पिकाचा एकदशांस हिस्सा द्यावयाचा. १९५७ मध्ये युनियनने अशी मागणी केली की कापलेल्या पिकाचा एक नवमांश हिस्सा मजुरी म्हणून मिळावा. या मागणी-साठीं युनियनने मोठ्या प्रमाणावर संप घडवून आणले. पण शेतकऱ्यांनी हे संप मोडून काढले. संपामुळे नव्हे तर सत्तेवर कम्युनिस्ट सरकार असल्याने युनियनची मागणी अखेरीस मान्य झाली.

१९५८ मध्ये शेतमजुरीचा रोजचा दर पुरुषास अडीच रु. व स्त्रियास एक रु. असा व्हावा व कामाचे तास सहा करावेत अशी युनियनने मागणी केली. मजुरीचा दर शेतकऱ्यांनी मान्य केला पण कामाचे तास कमी करण्यास नकार दिला. युनियनने, ९ ते १२ व २ ते ५ असे सहा तास सर्वांनी दररोज काम करावे असा आदेश दिला. या वेळा सर्वांना कळाव्यात म्हणून युनि-यनने आपले प्रतिनिधी सर्वत्र ठेवले व काम संपवण्याची खूण म्हणून लाल निशाण दाखविण्याची पद्धत सुरू केली. या पद्धतीने शेतमजुरांच्या कामाच्या वेळावर शेतकऱ्यांचे जे नियंत्रण होते ते नष्ट झाले. अखेर इंडस्ट्रियल रिलेशन्स कमिटीत हे प्रकरण जाऊन शेतकऱ्यांच्या खर्चाने ठराविक वेळी भोंगे वाजवि-ण्याची व्यवस्था करावी असे ठरले.

दरवर्षी युनियन जास्त मजुरीची मागणी करीत असे व मालकाकडून मजुरीचे दर काही प्रमाणात वाढवून घेण्यात यशस्वी होई. १९७० मध्ये मजुरीचे दर पुरुषास साडेसहा रु. व स्त्रियास पावणे चार रु. असे होते. १९७० मध्ये युनियनने ३९ मागण्या सादर केल्या. मुख्य मागण्या दोन होत्या. पुरुषांची मजुरी ७ रु. व स्त्रियांची मजुरी ४ रु. करावी आणि कापणीची मजुरी एक नवमांश वरून एक अष्ट-मांश करावी. कापणीच्या जास्त मजु-

रीची मागणी शेतकरी नेहमीच मान्य करीत. पण रोजची मजुरी वाढविण्यास त्यांचा विरोध असे. यावेळी युनियनने संप हरताळ करून मजुरीचे दर वाढवून घेतले. १९६४–६५ ते १९६९–७० या सहा वर्षांच्या काळात युनियनने सदस्यांची खरी मजुरी ६५ टक्क्यांनी व चलनी मजुरी १४० टक्क्यांनी (रियलवेज अँड मनी वेज) वाढवून घेतली. या काळात राहणी खर्च ४५ टक्क्यांनी वाढला हे लक्षात घेता युनियनने शेतमजुरांची स्थिती सुधारली हे स्पष्ट होते. या खेरीज युनियनने शेतात ट्रॅक्टर वापरण्याच्या प्रश्नावरही चळवळ केली. १९६७ मध्ये कम्युनिस्ट पक्ष परत सत्तेवर आल्यावर शेतकऱ्यांचे आणखी दोन महत्त्वाचे हक्क युनियनने मर्यादित केले. कोणत्या मजुराला कामावर घ्यावयाचे हे पूर्णपणे शेतकऱ्याच्या मर्जीवर राहिले नाही. त्याचप्रमाणे कापणीच्यावेळी जेवढे मजूर काम मागण्यास येतील तेवढयांना काम देण्याचे बंधन शेतकऱ्यांवर आले.

या साऱ्या चळवळीचा शेतमजूर व शेतकरी यांच्या विचारसरणीवर कोणता परिणाम झाला याचा अंदाज घेण्यासाठी अलेक्झांडर यांनी एक प्रश्नावली तयार केली होती. तिच्यातील काही प्रश्न असे–

१ : संप वगैरेच्या दडपणाखालीच शेतकरी मजुरी वाढवतात. २ : मजुरी वाढवून मागण्यात काही गैर नाही. ३ : शेतकऱ्यांना कोणास कामावर घ्यावयाचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य आहे. ४ : मजुरी कोणत्या स्वरूपात द्यावी हे ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांचा आहे. ५ : काम नीट न केल्यास शेतमजुराची कानउघाडणी करण्याचा अधिकार शेतकऱ्यास आहे. ६ : शेतमजुरांनी शेतकऱ्यांशी अदबीने वागावे. ७ : देखरेख नसल्यास शेतमजूर नीट काम करणार नाहीत.

या विधानांशी सहमत आहात काय असे शेतमजूर व शेतकरी या दोघांना विचारले व त्यावरून विचारसरणीतील बदलाचा अंदाज बांधला तेव्हा असे आढळून आले, की शेतमजूर व शेतकरी यांच्यातील पारंपरिक संबंध मानण्यास शेतमजूर तयार नाही. शेतकरी देखील काही बाबतीत पारंपारिक अधिकार बजावू इच्छित नाही. आपल्याला शेतमजुरांनी मान द्यावा अशी अपेक्षा तो करीत नाही. कामाचे तास ठरविणे, जमीन मोकळी ठेवणे, शेतमजुरास समज देणे हे आपले अधिकार आहेत असे बहुसंख्य शेतकरी मानीत नाहीत. याचा अर्थ असा की, आपले पारंपरिक अधिकार कमी झाले आहेत याची जाणीव शेतकऱ्यांना झाली आहे व आपले अधिकार वाढले आहेत याची शेतमजुरांना झाली आहे. मोठ्या शेतकऱ्यांनी हा बदल स्वीकारला आहे तर लहान शेतकऱ्यांच्या पचनी तो अजून पडला नाही असे अलेक्झांडर यांचे अनुमान आहे.

शेतकरी-शेतमजूर यांच्यातील संबंधांमधील वरील बदलांचा परिणाम म्हणून कुट्टनाड भागात खालच्या वर्गास

सोसावी लागणारी सामाजिक कुचंबणा कमी झाली आहे. खासगी व्यवहारात जरी नाही तरी सार्वजनिक व्यवहारात वरिष्ठ व कनिष्ठ जातींमध्ये समानता आली आहे व याचे मोठे श्रेय युनियनला जाते असे श्री. अलेक्झांडर नमूद करतात.

शेतमजूर व शेतकरी यांचे संबंध युनियनच्या पातळीवर गेल्याने शेतमजूर पूर्वीप्रमाणे अडचणीच्या प्रसंगी शेतकऱ्यांची मदत घेत नाहीत व शेतकरीही त्यांना मदत करीत नाहीत. अलेक्झांडर आपल्या पाहणीचा निष्कर्ष थोडक्यात खालीलप्रमाणे सांगतात–

'जातिव्यवस्थेच्या सर्वंकष नियंत्रणाखालील, संदिग्ध व थोडीफार सहकार्याची अशी, आजवरची शेतमजूर–शेतकरी यांच्यातील संबंधांची रचना कुट्टनाडमध्ये अंतर्धान पावली असून शेतकरी व शेतमजूर यांचे सबंध अधिक निश्चित व करारांनी नियंत्रित असे बनले आहेत व या संबंधावर परस्परद्वेष व वर्गलढा यांची गडद छाया पसरली आहे.'

हे सारे वाचताना आपण एखाद्या कारखान्यातील कामगार–मालक संघर्ष पहात आहोत असे वाटते. पण हे इतके सोपे नाही. शेतमजुरांची अशी संघटना बांधणे, त्यांना सामाजिक बधनातून मुक्त करून आर्थिक पायावर एकत्रितपणे व लढाऊपणे उभे करणे हे फार अवघड आहे. भातशेतीच्या पेरणी व कापणी या कामात कुट्टनाडचे शेतकरी मोठ्या प्रमाणावर शेतमजुरांवर अवलंबून आहेत म्हणूनच हे शक्य झाले असे वाटते.

आर्थिक स्वरूपाच्या संघर्षात दोन पक्ष निस्संदिग्धपणे तयार होणे, (फॉर्मेशन) त्यांच्यामध्ये परस्पर संबंधांची संघटनात्मक चौकट तयार होणे, ते आपापल्या गरजांसाठी एकमेकांवर पूर्णपणे अवलंबून असणे या गोष्टी पायाभूत आहेत. एवढे झाल्यावर मग कोणाच्या गरजेची तीव्रता मोठी, कोण किती काळ दम धरू शकतो यावर पुढील संघर्षाचे स्वरूप अवलंबून राहते. कुट्टनाडमधील शेतमजुरांच्या लढ्यामध्ये डाव्या कम्युनिस्टांची कडवी कार्यपद्धती, कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचे प्रसारण, शासनाचे मधूनमधून लाभलेले पाठबळ या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या असण्याची शक्यता आहे.

या पलीकडील एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कुट्टनाडमधल्या संघर्षातील दोन पक्ष (शेतकरी व शेतमजूर) हे सांस्कृतिक दृष्टयाही वेगवेगळे होते. म्हणून तेथे संघर्षाला वेगळी धार चढली. ज्या प्रमाणात सामाजिक (म्हणजे धार्मिक, जातीय वर्णीय) संघर्षाचे रूपांतर आर्थिक संघर्षात करता येईल त्या प्रमाणात शोषितांची शोषकांविरुद्धची लढाई यशस्वी होण्याची शक्यता वाढेल हा कुट्टनाडचा धडा दिसतो.

सुरुवातीस दिलेले श्रीमती जोन्स यांचे विधान कुट्टनाड लढ्यास बऱ्याच प्रमाणात लागू होते. कोणताही शोषितांचा लढा यशस्वी व्हावयाचा

असेल तर त्यांच्याठायी मुरलेली शक्तिहीनतेची जाणीव नष्ट करून त्यांना एखाद्या अंगभूत शक्तीची जाणीव देत राहणे व ती शक्ती वाढविण्यास त्यांचाच सहभाग प्रत्यक्ष घेणे हे महत्त्वाचे आहे. आजतरी आर्थिक प्रश्नांपुरती शोषितांना उपलब्ध असलेली शक्ती म्हणजे संघटनाच होय. आर्थिक प्रश्नात ही शक्ती वापरीत असताना तिचा प्रभाव सामाजिक संघर्षावरही काही प्रमाणात पडतो हे ध्यानात घेतल्यास सामाजिक विरुद्ध आर्थिक अशी एक दुफळी जी डाव्या चळवळीत पडलेली दिसते ती काही अंशी कमी होईल.

सर्व समाजरचना व तदंगभूत सामाजिक संबंध हे अखेरीस उत्पादनाच्या रचनेनुसार ठरत असतात हा मार्क्सचा सिद्धांत निदान डाव्या चळवळीने तरी विसरू नये व सर्व शोषितांच्या आर्थिक मुक्तीवर भर द्यावा. ● ● ●

---


| | | |
|---|---|---|
| वाचा प्रकाशन : ११ | | वाचा प्रकाशन : १२ |
| **अरण्य** | | **निस्संदर्भ** |
| कविता संग्रह | | कविता संग्रह |
| वसंत दत्तात्रय गुर्जर | | चंद्रकांत पाटील |
| किमत ६ रुपये | | किमत ५ रुपये |

**आमची इतर प्रकाशने :**

● मेलडी : भालचंद्र नेमाडे ● आयत्या कविता : मनोहर ओक ● इंद्रियोपनिषद : सतिश काळसेकर ● गपसप : ना. धों. महानोर ●

● छापत आहोत : हिल्लोळ : तुळशी परब ●

**पुस्तके मिळण्याची ठिकाणे :**

(१) मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव नाका, मुंबई ४.
(२) अभिनव पुस्तक मंदिर, गोखले रोड, पुणे ४.
(३) गुलमोहर बुक डेपो, खरी कॉर्नर, कोल्हापूर २.
(४) साहित्य सहकार संघ, औरंगपुरा, औरंगाबाद व इतर गावच्या शाखा

**वाचा प्रकाशन C/o प्रा. प्रकाश देशपांडे, ३७ नूतन कॉलनी, औरंगाबाद – ४३१ ००१**

# नरकातून मृत्युलोकात

**रवींद्र गुर्जर**

हिटलरच्या कॉन्सेंट्रेशन कॅम्प्सविषयी आजवर अनेक कथा व दंतकथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या सर्व कॅम्प्समध्ये दक्षिण पोलंडमधील ' ऑसविच् कॅम्प ' खूपच गाजला. जर्मनीच्या पराभवानंतर सदर कॅम्पमधून जे मोजके जीव बचावले त्यातील एक होत्या श्रीमती हेलेन फ्रूड. (Freud) काही दिवसांपूर्वी त्यांनी भारताला भेट दिली होती; त्यावेळी त्यांनी सांगितलेली दुर्दैवी सत्यकथा त्यांच्याच शब्दांमध्ये पुढे दिलेली आहे.

दक्षिण पोलंडमधील ऑस्विच्जवळच्या एका लहानशा स्थानकावर आमची घोडागाडी थांबली. गाडीत आम्ही शंभरावर स्त्री-पुरुष असू. हा प्रवास तीन-चार दिवस चालू होता. वाटेत अन्न, पाणी किंवा स्वच्छतेचा प्रश्नच नव्हता. ती बंदिस्त गाडी इतकी लहान होती की आम्ही गुदमरून जात होतो. एका बाईचे लहान मूल प्रवासात मरण पावले. जेव्हा त्या बाईने मेलेल्या मुलासह गाडीबाहेर उडी टाकली, तेव्हा बरोबरच्या एस्. एस्. गार्डस्नी ते मूल हिसकावून घेतले आणि फूटबॉल खेळण्याच्या आविर्भावात लाथाडले. आता आम्हाला कोणीकडे नेण्यात येत आहे याची पूर्ण कल्पना आली.

दोन वेगवेगळ्या रांगात स्त्रिया व पुरुषांना चालविण्यात आले. माझ्या यजमानांना त्यावेळी मी अखेरचे पाहिले. एका जर्मन डॉक्टरने केवळ अंगठ्याने आमची नाना तऱ्हेची तपासणी केली. त्याच्या इशाऱ्यावर आमचे भवितव्य अवलंबून होते. अशक्त व म्हाताऱ्यांना सरळ गॅस चेंबरमध्ये रवाना करण्यात आले. सशक्तांना जर्मन युद्ध साधन कारखान्यांमध्ये काम करण्याकरता लेबर कँपमध्ये नेण्यात आले. याच ठिकाणी मलाही नेले. स्त्री-कोठड्यांमध्ये रवानगी झाल्यावर आमचे सर्व सामान काढून घेण्यात आले. माझ्याजवळ अगदीच थोडे सामान होते, कारण मला अटक करण्याची ही तिसरी वेळ होती आणि फक्त कपडे–तेही अंगावरील–घेण्याची उदार परवानगी

देण्यात आली होती. नंतर आम्हाला अंगावरील सर्व कपडे काढावयास लावले. आमचा नैतिक अधःपात करण्यासाठी पुरुष कैद्यांना बोलावून त्यांना आमचे केस काढावयास लावले— ज्यावेळी एकही कपडा आमच्या अंगावर नव्हता. नंतर प्रत्येकीच्या डाव्या हातावर आकडा घालण्यात आला. त्या दिवसापासून आमचे नाव व व्यक्तिमत्त्व नष्ट झाले. त्याऐवजी एकमेव आकडा शिल्लक राहिला.

बरेच दिवस आम्ही उपाशी होतो. भूक म्हणजे काय चीज आहे हे त्यावेळी प्रथम जाणवले. नंतर आम्हा दहाजणींमध्ये पातळ सूपचे एक भांडे देण्यात आले. आमचे प्राण तर अगदी कंठाशी आले होते. चमचा फक्त एकच होता. एकाच वेळी एक या पद्धतीने सूप घ्यावे लागले. एकजण ते घेत असताना, ती दोन चमचे घेते की काय या भीतीने आणि मत्सराने इतरजणी पहात होत्या. सरतेशेवटी प्रत्येकीला एकूण तीन चमचे मिळाले. भुकेचे माहात्म्य आता मला कळले होते. आता जर भुकेपायी कोणी चोरी केल्याचे मला समजले तर मी त्याला कधीच शिक्षा करणार नाही.

आजूबाजूच्या गावापासून कँप संपूर्णपणे अलग केलेला होता. क्रॅकोव्हच्या पश्चिमेला साधारण चाळीस किलोमीटरवर ऑस्वायकिम् या पोलिश खेड्यानजिक तो उभारला होता. ती जागा निसर्गतःच इतकी दलदलीची व खराब हवेची होती की त्या परिस्थितीमुळेच बरेचसे कैदी मृत्युमुखी पडले. तेथील पाणी इतके दूषित होते की, वापरण्यास अगदी अयोग्य होते. पण कैद्यांना पिण्यासाठी त्याखेरीज दुसरे पाणीच नव्हते. सांडपाणी वाहून जाण्याची व्यवस्था नसल्याने जे साध्या कारणासाठी वापरणेही मुश्किल ते पिण्यासाठीही घ्यावेच लागे. त्या जागेत असह्य घाण सुटली होती. अशी ही खास जागा नाझींनी मुद्दामच निवडली होती.

सन १९४० पूर्वी ऑस्विच् कँपची सुरुवात झाली. लहान प्रमाणावर सुरुवात करून कॉन्सेन्ट्रेटेड कँपचे सर्व बांधकाम असे करण्यात आले होते की इतर एकोणचाळीस कँपमध्ये मुख्य कँप अंतर्भूत व्हावा. यातच इतिहासातील सर्वांत मोठा मृत्यूचा कारखाना ठरलेला बर्कनॉ कँप होता. एका दिवसाला तीस हजार प्राण हरण करण्याची तेथील गॅसचेंबरची क्षमता होती.

प्रेते जाळण्यासाठी खास उभारलेल्या जागेमध्ये मरण पावलेल्या कैद्यांना जाळण्यात येई. कँपच्या जमिनीवर चिखलच चिखल होता आणि कैदी लांब ओबडधोबड लाकडांवर झोपत असत. आय. जी. फार्बेन या जगप्रसिद्ध रासायनिक संस्थेची एक शाखा ऑस्विच्जवळ उभारली होती, जिथे दहा हजार कैद्यांना गुलामासारखे वागावे लागे. ते जेव्हा पूर्णपणे थकून जात व त्यांच्याकडून अधिक काम करवून घेणे अशक्य होई तेव्हा त्यांना गॅसचेंबरकडे पाठविण्यात येई. नवीन कैदी त्यांची जागा भरून काढीत, कारण

त्यांची मुळीच कमतरता नव्हती.

आमचे काम भयंकर कष्टाचे होते. एस्. एस्. नी ठार केलेल्या रशियन कैद्यांचे बूट आम्हाला कारखान्यात जाताना घालण्यासाठी दिले होते. अर्थातच ते आमच्या पायात योग्य प्रकारे बसत नसत. ते वापरण्याच्या पहिल्याच दिवशी माझे पाय रक्तबंबाळ झाले. आमचे काम असे होते–लोकांनी सोडून दिलेली घरे नष्ट करून त्यांच्या विटा जवळच्या तलावाजवळ नेऊन ठेवणे. आमच्यापैकी कोणीच कधी आयुष्यात कुदळ हातात घेतली नव्हती. आम्ही काम करीत असताना किंवा कोठडीत असताना आम्हाला सतावण्यात एस्. एस्. ना मोठाच आनंद होत असे. या जर्मन गार्डस्मध्ये काही स्त्रियाही होत्या. त्यातील एकेक ही प्रत्येक वीस पुरुष गार्डस्पेक्षा भयानक होती.

एकदा कामासाठी आम्ही तलावाजवळ गेलो होतो. एस्. एस्. नी ठेवलेल्या लाकडी ओंडक्यावरून तलाव ओलांडण्यास आम्हाला सांगण्यात आले. आमच्यापैकी एखादी ओंडक्याच्या मध्यावर पोहोचली की ते लोक लाकूड वरखाली करून तिला बर्फाप्रमाणे थंडगार पाण्यात खाली पाडायचे. अशा खेळात त्यांना फार मजा वाटायची. पाण्यातून बाहेर पडण्याच्या धडपडीत ती बाई ओंडका धरायची. मग सैनिक तिच्या बोटांवर पाय ठेवायचे आणि ती पुन्हा पाण्यात पडल्यावर ते मनमुराद हसत. असे एक ना अनेक प्रसंग.

अन्न अगदीच निकृष्ट दर्जाचे होते. सकाळी आम्हाला काळ्या रंगाचे पाणी देत, ज्याला ते अर्थात कॉफी म्हणत असत. दुपारचे जेवण म्हणजे पाणीदार सूप असे. रात्री ब्रेडचा छोटा तुकडा व सूप. ऑस्विच्मध्ये नोंदणी केलेले चार लाख कैदी होते. त्यातील सहा टक्के म्हणजे अंदाजे पंचवीस हजार भयानक कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पमधून बचावले. साधारणपणे चाळीस लाख ज्यू कैदी आकडा न देता आणि न नोंदवता गॅसने ठार करण्यात आले. मुले असलेल्या स्त्रिया सरळ गॅस चेंबरकडे रवाना व्हायच्या. याला मी अपवाद होते, कारण काही वर्षांपूर्वी व्हिएन्नामध्ये माझ्या मुलाला मारण्यात आले होते. त्यावेळी हिटलरच्या आगमनानंतर आमच्या टूथ ब्रशने आम्हाला रस्ते साफ करण्यास भाग पाडले होते. ते काम करताना मी पोटाला मूल बांधलेले पाहून एस्. एस्. नी मला लाथ मारली आणि माझ्या मुलाला तिथेच ठार मारले. मृतांना जाळण्यासाठी केलेल्या अग्नीच्या ज्वाळांमध्ये मुलांना भिरकावून देताना आम्ही पाहिले होते. ती मुले जिवंत असतील अशी शंकाही आम्हाला प्रथम येत नव्हती. पण त्यांच्या किंचाळ्या ऐकल्यावर पुढे आमचा भ्रमनिरास झाला.

जर्मन डॉक्टर्स जंतुविषयक संशोधनासाठी जिवंत आणि मृत शरिरे वापरीत. जुळी मुले हा त्यांचा प्रयोगाचा खास विषय होता. त्यांनी मृत कैद्यांच्या केसांची जाड पांघरूणे, हाडांची खते व चरबीपासून साबण या गोष्टी बनवल्या.

सुटकेनंतर काही जर्मन अधिकाऱ्यांच्या घरात आढळलेल्या मानवी कातडीच्या दिव्यांच्या शेड्स हा क्रौर्याचा कळस होता.

कॅम्पचे भोवताली असलेल्या टोकदार तारांमध्ये प्रचंड विद्युत प्रवाह सोडलेला होता. त्या तारांवर अंग झोकून देऊन कित्येक कैद्यांनी आत्महत्या केली. पळून जाण्याचेही काही प्रयत्न झाले. फारतर सहा जण त्यात यशस्वी झाले असतील. ज्यांचे हे प्रयत्न फसले त्यांना इतर सर्व कैद्यांसमोर फाशी देण्यात आले.

लाखो लोकांना एखाद्या सहज औद्योगिक प्रक्रियेप्रमाणे जगातून नाहीसे करण्यात आले. पण त्या आधी एस्. एस्. चे अनन्वित अत्याचार प्रत्येकाला सहन करावे लागले. सर्वसाधारणपणे जिथे कैदी धड उभाही राहू शकणार नाही अशा ठिकाणी छळ करून त्यांना ठार करण्यात येई. त्यांचा हा छळ क्षुल्लक चुकीसाठी शिक्षा म्हणून असे. उदाहरणार्थ, भूक असह्य होऊन कोणी कैद्याने अगदी कुजलेला बटाटा शेतातून चोरला असेल तर, इत्यादी.

दिनांक १० ऑगस्ट १९४३ रोजी माझी गॅस चेंबरसाठी 'निवड' करण्यात आली. आम्हाला या कँपमध्ये आणल्या-वरच नव्हे तर दर आठवड्याला अशी निवड होत असे. प्रत्येक क्षणाचा श्वास हा मृत्यूची वाटचाल करीत होता. नंतर आम्हाला 'मृत्यूगृहा'मध्ये नेण्यात आले. तिथे जमविलेल्या आम्हाला केवळ उभे राहाण्यापुरती जागा होती. त्या जागेत घडलेल्या न भूतो न भवि-ष्यती अशा गोंधळाचे वर्णन शब्दात करता येणे केवळ अशक्य. काही कैद्यांनी एकमेकांचा गळा दाबून प्राण घेतला. मी हजार वर्षे जरी जगले तरी ती रात्र मी विसरूच शकणार नाही. रात्र-भर मी उभी होते आणि माझी जाणीव-शक्ती जवळ जवळ नष्ट झाली होती. सकाळी या 'झोपे'तून मला जागे करण्यात आले. गॅस चेंबरकडे चालविले.

नियमाप्रमाणे गॅसचेंबरकडे ट्रकमधून नेताना कैद्यांचे सर्व कपडे काढून घेण्यात येत. पण त्या दिवशी बहुधा ट्रक नादुरुस्त असावा. त्यामुळे आमचे कपडे अंगावर तसेच ठेवण्यात आले. जर तसे नसते तर मी वाचू शकले नसते. चेंबर जवळ जवळ येत होते. अचानक मना-तून मला कोणीतरी बजावले, 'तू वाचण्याचा प्रयत्न केला पाहिजेस—तू वाचणार आहेस' इतर स्त्रिया जोर-जोरात रडारड करीत होत्या. सैनिक त्यांना इकडे तिकडे पळत, चाबूक मारून चेंबरकडे ढकलीत होते. ती

---


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

आरडाओरड वाढू लागली. सुदैवाने मी पिछाडीला होते. काहीही योजना न करता, क्षणाचाही विचार करण्यापूर्वीच मी खाली पडले आणि जवळ जवळ सैनिकांच्या पायांमधून बाजूला खाली उडी टाकली आणि एका झुडुपाआड लपले. या प्रयत्नात कोणीही नक्कीच मरणार होता. मग गॅसऐवजी डोक्यात गोळीची निवड का करू नये असाही विचार कदाचित मी केला असेल. पण गोळी आली नाही. मी झाडाझाडामागून जीव घेऊन दूरवर पळाले. इकडे काही स्त्रियांचा घोळका कारखान्यांमध्ये कामाला चालला होता. तो माझ्याजवळून गेला. एका सैनिकाने माझ्याकडे पाहिले आणि तो ओरडला, ' अरेच्या, तू मागे का घुटमळते आहेस? इतर जणींबरोबर तू का जात नाहीस ?' यापेक्षा दुसरे अधिक मधुर शब्द सर्व आयुष्यात कोणते बरे असू शकतील ! मी लगेच त्या बायकांमध्ये मिसळले. मला कोणी ओळखण्याचा प्रश्नच नव्हता. मात्र कॅम्पमधील माझी एक शेजारीण मला पाहून चकित झाली. मी तोंडावर बोट ठेवून पुटपुटले 'सूस्शू.'

काही दिवसांनी आमच्यापैकी जे मिश्र रक्ताचे होते, त्यांना दुसऱ्या ठिकाणी नेण्यात आले. माझे वडील ज्यू असले तरी आई ख्रिश्चन होती. त्यामुळे माझी ही ' बदली '' झाली. तेथून विजयी रशियन सैन्याने आमची सुटका केली. एका स्वीडिश रेडक्रॉसने मला स्वीडनला नेले आणि ऋग्णालयात दाखल केले. त्यावेळी माझे वजन फक्त एकोणऐंशी पौंड भरले. तिथे मी वर्षभर राहिले. मी सारखा विचार करीत होते की आपले सहा कैदी तुरुंगात मारले गेले असताना आपल्याला जगण्याचा काय अधिकार आहे ? एकदा मी झोपेच्या गोळ्यांचा मोठा डोस घेऊन माझे जीवन नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण डॉक्टरांना ते समजले आणि त्यांनी मला वाचवले. मी मलाच म्हणाले, ' माझे जीवन ही एक सक्तीची शिक्षा आहे. आता माझ्या जगण्याचे फक्त एकच उद्दिष्ट असू शकते—सर्व प्रकारच्या भेदांना व युद्धाला विरोध ! '

सुटका करणाऱ्या विजयी रशियन सैन्याला, युद्धानंतर कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पस् तसेच सोडून दिल्याचे आढळले. बाकी गॅस चेंबर्स व प्रते जाळण्याची ठिकाणे माघार घेणाऱ्या जर्मनांनी जाळून टाकली होती. त्या भयाण कॅम्पच्या जागेवर सध्या एक संग्रहालय आहे, ज्यात नाझी गुन्हेगारांनी केलेल्या राक्षसी कृत्याचे व वृत्तीचे दर्शन घडवणाऱ्या वस्तू दृष्टीस पडतात—आणि निष्पाप बळींचे दुःखही हृदय हेलावून टाकणारा आणि तीव्र संतापाखेरीज दुसरी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त होणार नाही. असा एक विभाग म्हणजे लहान मुलांच्या कपड्यांचे व खेळण्याचे ढीग—समोर उभे राहाते जिवंत मुलांना गिळणाऱ्या अग्नीच्या ज्वाळांचे दृश्य आणि जणू ऐकू येतो त्यांचा आक्रोश !

● ● ●

कामगार जगत

# बोनस, बोनस, बोनस !!!

दरवर्षी दिवाळी जसजशी जवळ येत जाते, तसतशा बोनस लढ्यांच्या नौबती झडू लागतात. मूळच्या 'बक्षिसी' स्वरूपाच्या ह्या पद्धतीला काही वर्षापूर्वीच कामगारांचा हक्क म्हणून कायद्याच्या स्वरूपात मान्यता दिली गेली. किमान चार टक्के बोनस कामगारांना मिळालाच पाहिजे ही भूमिका घेतली गेली. बोनससाठी कमाल मर्यादा वीस टक्क्यांची ठरवून दिली गेली. तथापी बोनस वाटपासाठी काही तत्त्वे शासनाने ठरवून दिली नाहीत आणि बहुसंख्य कंपन्यांनी किमान बोनस देऊन ज्यादा बोनसच्या मागण्या फेटाळून लावल्या. तर ज्या सुस्थापित कंपन्या कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी तीस टक्क्यांच्या आसपास बोनस देत, त्यांनीही वीस टक्क्यांच्या कमाल मर्यादेचा आधार घेऊन वीस टक्केच बोनस दिला. साहजिकच, अशा कंपन्यांतूनही बोनस लढे उभेच राहिले. चार टक्के बोनस देऊ करणाऱ्या कंपन्यांतून अधिक बोनस मिळावा म्हणून लढे सुरूच होते. 'बोनस'ला कायदेशीर स्वरूप येऊनही, म्हणूनच 'बोनस' लढे सुरूच राहिले आणि दिवाळीच्या सुमाराला दरवर्षी ह्या प्रश्नावरून वातावरण तापतच राहिले. औद्योगिक आघाडीवरील शांतता ढळतच राहिली. बोनस कायद्यातल्या उणीवांचाच हा परिणाम होता.

लढे वाढत गेले, वातावरण तापत गेले. शेवटी गेल्यावर्षी शासनाला पावल उचलावी लागली. ऐनवेळी वट हुकूमाद्वारे किमान बोनस चार टक्क्यावरून सव्वाआठ टक्क्यांवर शासनानं नेला. परंतु त्याला कायम कायद्याचं स्वरूप शासन देऊ शकले नाही. यंदाही अशाच वटहुकूमाचा आधार घेऊन शासन, ८¼% बोनस देववणार आहे. चार टक्क्यांच्या आसपास रेंगाळणाऱ्या कंपन्यांच्या कामगारांना हा दिलासा नक्कीच आहे. पण इतर अनेक कंपन्यातल्या बोनस लढ्यांवर काहीच उतारा ह्या वटहुकूमाने दिलेला नाही. शिवाय सव्वाआठ ते वीस टक्क्यांदरम्यानचे प्रश्न अनिर्णित ठेवलेच आहेत.

अशा ह्या परिस्थितीतच, बोनसची कमाल मर्यादा वाढवून घेण्यासाठी आंदोलन उभारण्याची हाक कामगार संघटनांनी दिली आहे. इंटकचे डॉ. दत्ता सामंत ह्यांनी, इंटकच्या बोनस लढ्यांच्या साखळीतून हा कायदा आम्ही बदलून घेऊ असा विश्वास नुकताच व्यक्त केला आहे. सीटूचे असे लढे सुरू आहेतच. स्रीअॅट टायर्समध्ये त्यांनी नुकताच २० टक्के बोनस अधिक १७½ टक्के सानुग्रह अनुदान असा ३७½ टक्के बोनस कामगारांना मिळवून दिला. आयटक, भारतीय मजदूर संघ, मजदूर सभा वगैरे संघटनाही आपा-

पल्या परीने या लढ्यात उतरल्या आहेत. बायर इंडियात नुकताच ह्याच कारणासाठी संप झाला. बुश रेडिओ-मध्ये संप टाळेबंदी ह्या क्रमाने हा लढा लढला गेला. ' कॅफी 'मध्ये तब्बल वर्ष भर ह्या प्रकरणावरून तीनशे कामगारांनी लढा दिला. ह्या कामगारांना काढून टाकण्याचा कंपनीचा निर्णय नुकताच हायकोर्टानें रद्द ठरवला असून प्रकरण आता सुप्रीम कोर्टाकडे जात आहे.

ह्या खेरीज बोनस प्रश्नांवरून आज सार्वजनिक संस्थांमधून लढे संघटित होत आहेत. रेल्वे, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट, मुंबई महापालिका, बेस्ट उपक्रम आदी संस्थांतून वेगवेगळ्या निमित्तांनी ' बोनस ' लढे आज उभारले जात आहेत. तूर्त जरी शताब्दी महोत्सवा-निमित्त, दुष्काळ-मदत म्हणून अशा ' बोनस 'ची मागणी होत असली तरी


शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन


पुढे मागे नियमितपणे बोनस मिळण्या-साठी लढे उभारले जाण्याची शक्यता कुणीच नाकारीत नाही.


ह्या लढ्यामधून जे दडपण आज शासनावर येत आहे, त्यातून काही निर्णय शासनाला घेणं, नजिकच्या काळात घेणं भाग पडणार आहे. शासनानं नेमलेल्या बोनस कमिशनचा अहवाल डिसेंबरच्या सुमारास येऊ घातला आहे. त्यानंतर बहुधा हिवाळी अधिवेशनातच लोकसभा ह्या प्रश्नावर काही विधेयक पसार करण्याची शक्यता आहे. त्यावेळी सध्याच्या बोनस कायद्या-तल्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. शक्यतो बोनस प्रश्नावरून औद्योगिक आघाडीवरील शांतता ढळण्याचे प्रसंग उद्‌भवणार नाहीत अशा पद्धतीनं नवीन कायदा झाला पाहिजे. बोनस वाटपासंबंधी निःसंदिग्ध मार्गदर्शन ह्या कायद्यात असलं पाहिजे. त्यांतल्या कलमांचा आधार घेऊन काम-गारांना कमीत कमी बोनस द्यायच्या संचालकांच्या मनोवृत्तीला वाव ह्या कायद्यान्वये मिळणार नाही इकडेही लक्ष दिलं पाहिजे.

ह्या संदर्भात आणखीही एकदोन गोष्टींचा विचार झाला पाहिजे. लोक-सभेत ह्या प्रश्नावर चर्चा चालू असता, बोनसपैकी काही रक्कम प्रॉव्हिडंट फंडात जमा व्हावी अशी सूचना एका कम्युनिस्ट खासदाराने केली होती. दुर्दैवाने, ही एक विधायक सूचना असूनही, केवळ विरोधी पक्षीयाची म्हणून फेटाळली गेली. पुनर्गुंतवणुकीच्या

दृष्टीने ही योजना चांगली तर होतीच, परंतु कामगारांच्या दृष्टीनेही ती फायदेशीर होती. अशीच एक सूचना ह्यापूर्वीही पुढे आली होती. कामगारांना मिळणाऱ्या बोनसपैकी काही विशिष्ट रक्कम ते काम करीत असलेल्या कंपनीतच ' शेअर्स 'च्या रूपानं गुंतवली जावी, ही ती सूचना. ह्या पद्धतीनं कामगारांना व्यवस्थापनात भागीदारी आपोआपच मिळेल. त्यांना नियमित जोड उत्पन्नाची हमी मिळेल. शिवाय ' भागीदारी ' मिळाल्यामुळे जबाबदारीची जाणीव त्यांच्यात येईल. कंपनीच्या कारभारावर प्रत्यक्ष परिणाम त्यामुळे होतीलच. कामगार-मालक नात्याला वेगळं स्वरूप येईल व औद्योगिक कलहही बऱ्याच प्रमाणात कमी होतील. खेरीज औद्योगिक संस्थांना त्यांच्या विस्तार कार्यक्रमासाठी व अन्य योजनांसाठी भांडवल सहजी उपलब्ध होईल ते वेगळंच.

कामगार त्यांच्या तुटपुंज्या वेतनातून कुठे गुंतवणूक करू शकतील हे कठीणच. त्यांच्या बोनसच्या रकमाही (चार टक्के असोत की वीस टक्के) बहुधा खरेदीतच खर्च होतात. तेव्हा त्यातलीच काही रक्कम अशी वगळता आली तर ते त्यांच्या व उद्योगाच्या—दोघांच्याही दृष्टीनं श्रेयस्कर आहे. वरील योजना जर काही तांत्रिक अडचणींमुळे स्वीकारता येऊ शकत नसेल, तर किमान काही रक्कम ' युनिट ट्रस्ट 'च्या युनिट्स्च्या खरेदीकडे तरी वळवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे !

**—माणूस प्रतिनिधी**




# गार्बो

## रूपवेधची पहिली निर्मिती

महेश एलकुंचवार या तरुण एकांकिकाकाराचे ' गार्बो ' हे दोन अंकी नाटक सादर करून डॉ. लागूंनी ' रूपवेध ' या नव्या नाट्यसंस्थेच्या कार्याला प्रारंभ केला आहे. शब्दशरण, कथानकप्रधान व्यावसायिक रंगमंचाच्या चक्रात न सापडता रंगभूमी या कलामाध्यमाच्या कलारूपाचा वेध घेणारी संस्था श्रीराम लागूंसारख्या व्यासंगी, कल्पक नटदिग्दर्शकाने स्थापन करावी, हे मराठी प्रायोगिक रंगभूमी अजूनही सचेतन असल्याचे द्योतक आहे. व्यावसायिक रंगमंचावर यशस्वी झालेल्या कलावंताने प्रायोगिक रंगमंचावरही कार्य करीत राहणे म्हणजे स्वतःच्या विकासाची दिशा मोकळी ठेवणे आहे. कलावंताला आपण निवडलेल्या कलामाध्यमातून जे सांगावयाचे असते, ते सतत दुसऱ्यांच्या कलाने सांगणे जवळजवळ अशक्यच; म्हणून तो स्वतःची वाट स्वतःच शोधीत असतो.

डॉ. लागूंनी ' रूपवेध ' या संस्थेची स्थापना, अशाच हेतूने, व्यावसायिक

रंगमचावरील काही भूमिकातून निवृत्त होतानाच केली होती. या संस्थेने पहिल्या निर्मितीसाठी निवड केली ती आजचे एकांकिकालेखक म्हणून ज्ञात असणाऱ्या महेश एलकुंचवार या लेखकाच्या नाटकाची! 'एका म्हाताऱ्याचा खून', 'होळी', 'सुलतान' 'यातनाघर' यासारख्या त्यांच्या एकांकिका प्रायोगिक रंगमंचावर गाजल्या होत्या; इतकेच नाही, तर 'होळी'मुळे, मध्यंतरी थंडावलेली, प्रेक्षकसहवासाचा रंगमंच उभारण्याची कल्पना पुन: चेतली गेली होती. महेश एलकुंचवार या नाटककाराच्या वाङ्मयीन चेहऱ्याची वैशिष्टये सांगू म्हटले तर आवेग, हिंसा आणि हळवे-पणा यांचे संमिश्र रूप डोळ्यासमोर उभे राहते. हिंसा [Violence] ज्यावेळी रंगमंचावर आविष्कृत होते त्यावेळी ती विविध रूपे धारण करते; किंबहुना ती विविध गहन मानवी अनुभव व्यक्त करते. नवनाटयावर वा आधुनिक साहित्यावर असमंजसपणे आक्षेप घेणारे विरोधक नेहमी हिंसेकडे बोट दाखवून नवनाटय हे केवळ सन-सनाटी आहे असे भासविण्याचा यत्न करतात. परंतु गंभीर कलाकृतीमधील हिंसा आणि गुप्तहेरांच्या कथेमधील वा चित्रपटातील हिंसा यातील मूलभूत अंतर आपण रसिकांनी ध्यानी धरावयास हवे.

तसे पाहिल्यास आदिकाळापासून नाटयाविष्कार आणि हिंसा यांचे अपरिहार्य नाते सर्व संस्कृतींनी गृहित धरले आहे आदिमानवाच्या काळातील मनुष्यबळी, तदनंतरच्या लोकनाटय-परंपरेतील रावणदहन, शंखासुरवध, दुर्योधनवध हे नाटयाचा हिंसेशी असणारा अन्वयच अधोरेखित करणारे आहेत. ग्रीक शोकात्मिकांकडे पाहताही खून, मृत्यु, स्वत:ला अंध करून घेणे अशी अनेक दृश्ये दिसतात आणि तरी आपण आधुनिक प्रायोगिक रंगमंचा-वरील हिंसेचा वेगळा उल्लेख का करतो? कारण आज रंगमंचावर वा तत्पूर्वी नाटयसंहितांमध्ये व्यक्त होणारी हिंसा वेगळ्या स्वरूपाची आहे. नाटय-कृतीच्या परिघातच घडणाऱ्या हिंसेचा विचार केला तर एखाद्या पात्राने स्वत:चा चालविलेला छळ वा एकाच पात्राचा अनेकांनी केलेला निर्घृण छळ आज नाटकात व्यक्त होतो. हा छळ अर्थातच मानसिक असतो. 'Children of the wolf' सारख्या नाटकातील शरीर हिंसा ही सुद्धा गुंतागुंतीच्या मानसिक क्रिया प्रतिक्रियांतून निर्माण झालेली असते. काही नाटयकृतीत नाटकातील सारी पात्रे प्रेक्षकांकडे आपला रोख वळवतात: जेने, आयेनेस्को यांच्या नाटकात आपल्याला याही हिंसेचा प्रत्यय येतो; तर कधी प्रेक्षक नाटकातील पात्रांच्या रोखाने आपला रोख वळवितात. यातील कोणत्याही पद्धतीची हिंसा नाटयकृतीत योजली गेलेली असली तरी ती शस्त्राने केलेल्या हत्येपेक्षा अधिक क्रूर आणि म्हणून अधिक परिणामकारक होते.

आजच्याच नाटककारांना हिंसेचा

आविष्कार का करावासा वाटतो याही प्रश्नाचे उत्तर फारसे अवघड नाही. एखादे निरुपद्रवी जनावरही कोपऱ्यात गाठले असता चाल करून येते त्याच-प्रमाणे परिस्थितीच्या कोंडीत सापड-लेला आजचा 'माणूस' स्वत्व राख-ण्याच्या या आणीबाणीच्या प्रसंगी (Crisis of identity) क्रूर श्वापदा-सारखा आक्रमक होतो. हेच त्याचे क्रूर रूप विकल आणि केविलवाणेही असते.

'गार्बो' तोल भडक वाटणारी हिंसाही वेगाने हरवणाऱ्या मानवी सृजना-त्मक शक्तीच्या शोधातून, त्या शोधा-नंतर येणाऱ्या हताशतेतून निर्माण झाली आहे. ही हताश वृत्ती विविध प्रकारच्या प्रतिक्रियातून नाटककाराने व्यक्त केली आहे.

## तीन व्यक्ती...तीन वृत्ती

'गार्बो'चा पडदा उघडतो त्यावेळी इन्टुक (इन्टलेक्चुअल : श्रीराम लागू) एका उंच पाठीच्या खुर्चीत अवघडल्या हातांनी बसला आहे; तर समोर दिवाणा-वर तरुण पॅन्झी – अमोल पालेकर – ट्रॅन्झिस्टरशी खटाटोप करतो आहे, कुवेतच्या 'हिट' गाण्यासाठी वेडा झाला आहे. एकटे राहण्याचे ज्यांना भय वाटते ती माणसे सारखी आवाजाच्या, गर्दीच्या खोटचा सोबतीत स्वतःला पुरून टाकतात – तसा हा पॅन्झी ! इन्टुक मात्र अलिप्त 'इट डझन्ट मॅटर' म्हणणारा; आम्हाला कुठेच गंमत वाटत नाही म्हणणारा; स्वतःच्या प्राध्यापकीची, कवित्वाची दिल्लगी उडवणारा 'सिनिक्.' ट्रॅन्झिस्टरचे सेल्स घेऊन येईल म्हणून ज्याची पॅन्झी वाट पाहतो आहे तो 'श्रीमंत' (दत्ता भट) संपत्ती सुख देत नाही म्हणून माणसांची खेळणी बनविणारा एक शरीराने जग-णारा पुरुष ! ही तीन् पात्रे म्हणजे व्यक्ती नाहीत तर सृजनात्मकतेला विन्मुख होणाऱ्या तीन वृत्तीच आहेत. पॅन्झी हा कोवळा मुलगा, घरदार सोडून पळून आला आहे – आत्म-हत्येच्या प्रयत्नापर्यंत जाऊन मागे फिरला आहे. नात्याची-इतिहासाची पाळेमुळे तुटलेला आणि मरणेच्छा बाळगूनही अस्तित्व संपविण्याचा धीर न झालेला असा हा, केवळ जिवंत आहे म्हणून जगणारा जीव ! त्याला कधी-तरी चित्रकार व्हायचे आहे...पण आता आर्ट स्कूलमध्ये न जाता नुसताच तासामागून तास ढकलतो आहे. इन्टु-कचा भूतकाळ माहीत नाही; परंतु तो कवी आहे; कविता लिहिण्याचे त्याने थांबवले आहे. ... 'फेमफेमस म्हणजे काय अखेर ? त्याला तसा अर्थ काय ? प्रसिद्धी म्हणजे काय ? तर तो खरं म्हणजे आपल्या अस्तित्वाला चिकटलेला एक बऱ्यापैकी आरोप....तो सुद्धा डॅम पोकळ.' एका तऱ्हेने त्याचा हा menopause आहे. तर श्रीमंत आता तसा पुरुष राहिलेला नाही. पॅन्झी चित्रकलेचा व्यासंग करीतच नाही. म्हणजे यातील प्रत्येकजण सृजनविन्मुख अशा अवस्थेला येऊन पोचला आहे; आणि म्हणूनच यातील प्रत्येक 'गार्बो'ची वाट पाहतो आहे. गार्बो यांच्यापेक्षा वेगळी आहे का ? खरे तर

नाही. पण हे सर्व तिच्याकडे विलक्षण अपेक्षेने पाहतात. कारण प्रत्येकाने आपल्या काही अपेक्षा तिच्यावर आरोपित केल्या आहेत. म्हणून ती: गार्बो (दीपा श्रीराम) अनेकांच्या स्वप्नांची राणी असणारी गार्बो ही नटी आणि भर ओसरल्यावर, भूमिका मिळत नाहीत म्हणून अनेकांची शय्या-सखी होणारी ही गार्बो यांच्यामध्ये अंतर आहे. ते या नावामुळे अधिक विदारक वाटते. [हेमिंग्वेच्या 'फॉर हूम द बेल टोल्स्'मधील ग्रेटा गार्बोचा एक हृद्य संदर्भ वाचकांना आठवत असेलच.]

'गार्बो' हे नाटक बहुसंख्य मराठी नाटकांप्रमाणे काही पात्रांच्या आयुष्याची कथा सांगणारे नाही. तर सामान्य जीवनातला प्रेरक मंत्र विझला की माणसे विध्वंसक, क्रूर होतात हा अनुभव व्यक्त करणारे नाटक आहे. पौरुष गमावलेल्या श्रीमंताला, आपल्या शरीराला आधार असे शरीर हवे आहे—कोवळ्या पॅन्झीचे. अलिप्त दिसणारा, गार्बोशी फटकून बोलणारा—वागणारा इन्टुक खूप खोल गाभ्यात तिच्याशी गुंतलेला आहे. पॅन्झीला गार्बोशिवाय सुचत नाही आणि तरी आपण इतरांपेक्षा वेगळे हे दाखविण्या-साठी तो तिच्याशी आपले वेगळेच नाते आहे हे सुचविण्याचा यत्न करतो. श्रीमंताविषयी किळस वाटूनही त्याच्या संपन्नतेमुळे तो त्याच्याकडे ओढला जातो. या सर्वांचे लक्ष जिच्याकडे लागले आहे ती गार्बो कशी आहे—काय आहे? ती एकसंध काही असण शक्यच नाही, कारण ती सर्वांच्या अपेक्षा—कल्पना यातून निर्माण झाली आहे. ती साधीसुधी हाडामासाची स्त्री आहे तरी गूढ आहे; कलावंती आहे—पोटासाठी वाटेल ती भूमिका स्वीकारणारी extra नटीही आहे, ती मायावी आहे—खरीही आहे, ती वेश्या आहे आणि तरी ती मूर्तिमंत मातृत्वही आहे! या अशा विलक्षण व्यक्तिरेखा, आणि त्यांच्यातील गुंतागुंतीचे संबंध यातून नाट्यकृती निर्माण करणे आणि ती नाट्यात्मकतेने सादर करणे अत्यंत अवघड आहे.

महेश एलकुंचवार यांनी पहिल्या अंकात इन्टुक, पॅन्झी, श्रीमंत यांच्या जीवनातील निरर्थकता, कंटाळवाणेपणा, संवादातून, एकमेकाला दुखविणारे बोलण्याच्या त्यांच्या लकबीतून, वेळ घालविण्यासाठी खेळल्या जाणाऱ्या खेळातून, व्यक्त केला आहे. आज पाश्चात्य रंगमंचावर येणाऱ्या अनेक नवनाट्यात नाटकातील नाटक आणि एकमेकाला रिझविण्यासाठी खेळले जाणारे खेळ याला विशिष्ट स्थान आहे. आयॅनेस्कोच्या 'chairs'मधील वृद्ध दांपत्यांचा खेळ, अॅलबीच्या वा जेनेच्या नाटकात येणारे खेळ यामधून, माणसे, नाट्यपूर्णतेने एकमेकांशी संवाद साधू शकत नाहीत. अथवा तो त्यांना टाळा-यचा असतो तेव्हा एकमेकांच्या मनो-रंजनासाठी असे खेळ खेळतात, हे सुच-विलेले असते. निरर्थक कंटाळवाण्या जीवनाच्या पार्श्वभूमीवर हे खेळ अधिकच केविलवाणे वाटतात. पहिल्या

अंकात नाटककाराने कृतक खटला, वेश्या आणि तीन गृहस्थ आणि तात्या व इतर, असे तीन खेळ योजले आहेत. यातील पहिल्या दोन खेळांचा आणि मूळ नाट्यसंकल्पनेचा अन्वय जुळतो. तात्या आणि इतर यामधील स्वपाविश्याच्या कल्पनेत मग्न राहाणाऱ्या तात्यांचे विडंबन फार ढोबळ आणि म्हणून या नाट्यकृतीत नकोसे वाटते. मात्र या खेळाच्या निमित्ताने इन्टुक, श्रीमंत, पॅन्झी यांनी एकमेकांची भूमिका करणे अत्यंत मार्मिक असून त्यातून त्यांचे परस्परातील विरोध-आकर्षण फार छान स्पष्ट होते. हा खेळ खेळून थकून बसणाऱ्या गार्बोच्या 'आपण भयानक फ्रिव्हॉल्स होतो'ला इन्टुक उत्तर देतो त्या उत्तरातच अशा खेळांचे प्रयोजन व्यक्त होते—'सॉक्रेटिस म्हणतो, समाधानी डुक्कर होण्यापेक्षा असमाधानी माणूस व्हावे.' आपण डुकरं आहोत...नि असमाधानी व्हायलाच लागतं आपल्याला. नाहीतर मरून जाऊ गुदमरून. आहे कुणात धैर्य आतल्या पोकळीत वळून पहायचं?' गार्बोच्या त्यादिवशीच्या विचित्र वागण्यावरून साऱ्यांच्या लक्षात येते की ती आई होणार आहे. इन्टुकची पहिली प्रतिक्रिया व्यवहाराची सावधपणाची आहे; तर श्रीमंताची : उदारपणाचा आव आणून पितृत्व मिळविण्याची आपल्या व्यंगावर विजय मिळविण्याची आहे. पण गार्बो परत जायला निघते त्यावेळी अचानक घाणीचे सौंदर्यशास्त्र बांधायला निघालेल्या इन्टुकलाच जाणवते की गार्बोचा गर्भ ही त्यांना सर्वांना मिळालेली एकमेव संधी आहे. तो भारावून गार्बोपुढे नत होतो तिला सांगतो...'एवढी एकच संधी—एकच संधी आहे फक्त तुझी सगळी शक्ती पुन्हा लखलखीत होईल सूर्यासारखी नि फुलासारखा वाढत जाईल तो त्या प्रकाशात—गार्बो.' त्या तिघांनी गायिलेल्या मातृसुक्तातच पहिला अंक संपतो.

दुसऱ्या अंकाच्या प्रारंभी तिघेजण एकाच दिवाणावर खेळण्यांशी — पुस्तकांशी खेळत गार्बोची वाट पाहाताहेत. इन्टुकची अधीरता विशेष हृद्य वाटते. खरोखरीच गार्बो आत येते — इन्टुकची आणि तिची नजरानजर होते. त्याची नजर चुकवीत ती उसन्या अवसानाने श्रीमंत, पॅन्झी यांच्या उत्साहात सामील होते. इन्टुक सारे प्राण गेल्यासारखा एकटा उभा असतो. त्याला कळलंय की सगळं संपलंय. हे साऱ्यांना कळते तेव्हा पुन्हा शब्दाने एकमेकाला ओरबाडणे सुरू होते. पुन्हा घाणीकडे परत जाण्याचा मार्ग पायाखाली येतो. कारण सृजनाच्या आश्वासनानंतरची ही विफलता अधिक भयंकर असते. गार्बो परत जायला निघते त्यावेळी ते तिचा खून करतात. पण हा खून नाममात्र आहे. इन्टुकच्या शब्दात सांगावयाचे तर 'गार्बो मेली! तिचा खून झालाय. की आधी ती मेली नि मग तिचा खून झाला?' आजच्या नाटकातील हिंसा ही मानसिक आहे — गार्बोचा खून हा नाममात्र त्या सर्वांच्यातील सृजनात्मक शक्तीची ओहोटी अधिक भयंकर आहे.

'गार्बो'तील अनुभवाची चर्चा नेह-

मीच्या 'मध्यंतर'मधील नाट्यसंहितेच्या चर्चेपेक्षा अधिक विस्ताराने केली कारण हा अनुभव विलक्षण आहे. हा अनुभव नाट्यरूप कसा होतो याचा विचार केल्यास एलकुंचवारांच्या एकांकिकांप्रमाणेच त्यातील शब्दबाहुल्य निश्चित खटकते. विशेषत: इंटुक आणि गार्बो यांच्यातील भूतकालीन संबंधाचा वेगळेपणा श्रीराम लागूंनी अभिनयातून इतक्या समर्थपणे व्यक्त केला होता की गतकालाच्या स्मृती आळवणारा इंटुक व गार्बोचा भावविवश संवाद या नाटकाच्या पोताशी जुळता वाटला नाही. नाटकातील अनुभवाचे रंग, व्यस्तता लक्षात घेता त्या तुलनेने दोन अंकांची रचना अत्यंत सुरचित, सुबक वाटली. त्या सुबकतेमुळेच अनुभव रसिकांपर्यंत तीव्रपणे पोचला नाही असे वाटते. नाटकाची मूळ संकल्पना जितकी गहन तितकी संपूर्ण नाट्यकृती गहन वाटली नाही.

## प्रयोगाबद्दल....

श्रीराम लागूंनी दिग्दर्शक म्हणून संकल्पिलेले नाट्यरूपही मला व्यक्तिश: पटले नाही 'गार्बो'मधील अकथनात्मक स्वरूप लक्षात घेता नाट्यप्रयोग इतक्या सरळ स्पष्टीकरणात्मक रेषेत का योजला जावा? गार्बो राजस्थानातून शूटिंगहून आली आहे, म्हणून तिने राजस्थानी पोषाख करणे हा तर्कक्रम प्रतिकृतीवादी नाट्याला शोभेसा होता. सृजनाचा हिरवा रंग तिच्या पोशाखाला निवडण्याचे प्रयोजन पटले तरी वरील क्रम पटत नाही. तसेच गार्बो व इंटुक यांनी गतकालातील स्मृती आठवत एकमेकाच्या विरुद्ध दिशेला चालत जाणे ही खास भावविवश नाटकाची शैली वाटली. बापू लिमये यांनी उभ्या केलेल्या नेपथ्याच्या स्वच्छ नितळ रेषाही या नाट्यानुभवाला विपरीत भासल्या. त्यांनी निर्माण केलेल्या खुर्च्यांना लागूंनी इंटुकच्या लकबीतून समर्थन दिले आणि कृतक


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

खटल्याला त्याच खुर्च्यांचा पिंजरा म्हणून उपयोग होऊ शकला हे खरे असले तरी 'गार्बो'तील पात्रे ताठ पाठीच्या खुर्च्या वापरतात हेही मनाला पटत नाही.

कोवळ्या वयाच्या स्त्रैण 'पॅन्झी'ची भूमिका अमोल पालेकर यांनी आपल्या नेहमीच्या भाषिक व आंगिक लकबींना मुरड घालून केली. मराठी नाटकात आजवर अशी भूमिका विनोदासाठी योजली जात होती. या नाटकात ती तशी स्वीकारली जाऊ नये याची यथायोग्य काळजी दिग्दर्शकाने व नटाने घेतली आहे. श्रीराम लागूंचा खर्जातला आवाज, सरळ रेषेतील वाक्यांची लय ही 'इंटुक'च्या 'कोसला' शैलीतील वाक्यांना स्वभावतःच अनुरूप होती. परंतु त्या जोडीला गार्बोविषयीच्या प्रतिक्रिया अशब्द अभिनयातून त्यांनी ज्या कौशल्याने रसिकांपर्यंत पोचवल्या त्यातून पुन्हा एकदा लागूंच्या संयत अभिनयाच्या सामर्थ्याचा प्रत्यय आला. विशेषतः दुसऱ्या अंकात गार्बो परत आल्यानंतर पॅन्झी व श्रीमंत यांना ज्याचा मागमूसही नाही ते सत्य आपल्याला कळले आहे हे त्यांनी प्रेक्षकांना ज्या थिजल्या मुद्रेतून व्यक्त केले–ती मुद्रा रक्ताचे पाणी करणारी होती. पुढच्या साऱ्या शब्दगत स्पष्टीकरणापेक्षा कितीतरी प्रभावी! त्याक्षणी श्रीमंत, पॅन्झी यांनी मुखवटे घातलेले असणे हेही दिग्दर्शनातील चातुर्याचा प्रत्यय देणारे होते. इंटुक अनेक क्षण खुर्चीत अवघडून बसलेला असतो–याक्षणी लागूंनी आपल्या हाताची बोटे–संपूर्ण पंजा अतिशय बोलकेपणे वापरला. गार्बोची गुंतागुंतीची अवघड भूमिका दीपा श्रीराम यांची. त्यांच्या अभिनयातील ताजेपणाचा सुखद प्रत्यय आपल्याला 'अनुष्ठान' 'गिधाडे' 'अवध्य' यामध्ये आलेला आहे. परंतु या भूमिकेत मात्र त्या कमी पडल्या. विशेषतः त्यांचा अनुनासिक स्वर आणि वाक्यांची न बदलती लय–गार्बोच्या बदलत्या लहरी वृत्ती व्यक्त करायला असमर्थ ठरली. अर्थात ही भूमिका लेखनातही कच्ची आहे. दत्ता भट हे बऱ्याच वर्षांनी प्रायोगिक रंगमंचावर आले; गार्बोतील 'श्रीमंता'ची भूमिकाही महत्त्वाची होती. परंतु भटांनी ही भूमिका फारच पृष्ठभागावर सादर केली. विशेषतः काही ठिकाणी इतरांचे संवाद चालू असताना भट नाटकातून निवृत्त होत होते. भटांसारख्या कसलेल्या नटाने संवादात घसरणे, संपूर्णपणे नाटकात नसणे, आश्चर्यकारकच होते.

'गार्बो'च्या प्रयोगाचा विचार करता, मन अस्वस्थ करणाऱ्या अनुभवाचा अत्यंत वीटस चलाख प्रयोग असे वर्णन डोळ्यासमोर येते. नाट्य लेखनात रचनादृष्ट्या आणि प्रयोगसंकल्पनात शैलीच्या दृष्टिकोनातून, काहीतरी निश्चित खटकत होते. हे काहीतरी नक्की शोधावे म्हणून पुन्हा प्रयोग पाहाणार होते. परंतु योग न जमल्यामुळे या प्रतिक्रिया तशाच नोंदल्या आहेत.

एक मात्र निश्चित की व्यावसायिक

रंगमंचावर येणाऱ्या कोणत्याही नाटकापेक्षा 'रूपवेध'च्या 'गार्बो'ने रंगभूमीसाठी अधिक काही साधले आहे. या आणि अशाच प्रयोगांच्या अपयशानेही, मतभेदांनीही व्यावसायिक रंगमंचावरील यशापेक्षा अधिक लक्षणीय असा विकास होणार आहे.

जाता जाता एक विचार–'गार्बो' इंटिमेट थिएटरच्या पद्धतीने अधिक प्रभावी होईल का ? ●

## सत्यदेव दुब्यांचे
## अहो व्यवहारचातुर्य ! !

मराठी 'सखाराम बाइंडर'चा हिंदीत 'अरे सखाराम' झालेला तुम्ही वाचला असेल. परंतु सखाराम बाइंडर हे प्रकरणच एकूण इतके उद्गारचिन्हवाचक आहे की त्यापुढे एका 'अरे'चे काय मनावर घ्यायचे? अलीकडे दुब्यांचा 'हयवदन'चा प्रयोगही 'आह हयवदन' या नावाने आला आणि नवे हास्यनाटक 'अच्छा, और एक बार' नाव घेऊन आले, तेव्हा मात्र आश्चर्य वाटले. नाट्यप्रयोग पाहून प्रेक्षकांनी उद्गार काढायचे – तर हा दिग्दर्शक निर्माताच का उद्गारतो ?

पण एका सुप्रभाती 'Times of India' तील जाहिराती वाचता वाचता साक्षात्कार झाला की ही सारी उद्गारवाचके 'A' ने सुरू होतात. याचाच अर्थ नाटकाच्या जाहिरातीत 'थिएटर युनिट'ला अग्रक्रम मिळतो.

असे हे दुब्यांचे 'अहो व्यवहारचातुर्य' !

–पुष्पा भावे

## सुस्त्रीचातुर्यदर्शन प्रहसन

महाराष्ट्रीय कलोपासकांनी आपल्या 'प्रयोग' उपक्रमात सप्टेंबरमध्ये 'सुस्त्रीचातुर्यदर्शन अथवा गुलाबछकडीचा फार्स' सादर केला. दत्तात्रय वासुदेव केळकर यांनी १८५४ ते १८६० च्या दरम्यान हा फार्स लिहिलेला असावा. कारण त्या सुमारास या फार्सचे प्रयोग झाल्याची नोंद आहे. प्रत्यक्षात १८८० च्या पुढे या फार्सांना पुस्तकरूपाने प्रकाशीत होण्याचे भाग्य लाभले. नाट्यइतिहासात अशी नोंद आहे की बाळा कोटिभास्कर या गृहस्थाने मुंबईला इंग्रजी नाटकाच्या शेवटी 'फार्स' हा नाट्यप्रकार पाहिला. त्याच धर्तीवर 'सीता हरण' नाटकाच्या अखेरीनंतर 'जरठ-कुमारी विवाह दुष्परिणाम' हा फार्स केला. मराठीमधला हा पहिला फार्स मानला जातो. त्या काळात इंग्रजी नाटके दोन प्रकारची होती, एक तर संगीतप्रधान आणि दुसरा प्रकार म्हणजे हास्यरस प्रधान ! संगीतप्रधान नाटकापेक्षा विनोदी किंवा हास्यरसप्रधान नाटकांना जाण्याचा भारतीय लोकांचा कल असावा, असे दिसते. कारण त्या विनोदी नाटकांच्या कल्पनेतूनच आपल्याकडे 'फार्स' हा प्रकार आलेला दिसतो. आपल्या प्रेक्ष-

कांनी इंग्रजी नाटकांची विभागणी स्थूलमानाने केलेली होती. गाणे असलेले नाटक म्हणजे ऑपेरा किंवा म्युझिकल ड्रामा आणि गद्य असेल तो फार्स !

फार्स हा सामाजिक स्वरूपाचा नाट्यप्रकार. समाजातील व्यंगे, दोष, समकालीन जीवनातील काही प्रवृत्तींचे दर्शन या फार्समधून केले गेले. समाजातल्या अनेक चालीरीतींवर उपरोधाने—उपहासाने-विडंबनात्मक लेखनाने कोरडे ओढले जाऊ लागले. सामाजिक विषय हा फार्समधून व्यक्त करण्याची चाल पुढे निर्माण झाली. फार्सांच्या नावांवरूनही त्याची कल्पना आपल्याला येते. उदा. हुंडा प्रहसन, फॅशनेबल वाईफ, विजोड दंपती, ढोंगी बैराग्याचा फार्स, चहाडखोर शास्त्र्याचा फार्स, मोर एल. एल्. बी. चा फार्स इ. या फार्सांमध्ये सामाजिक सुधारणांची जशी टीकाटिंगल आहे, तसाच सुधारणाविषयींचा पुरस्कारही आहे. त्यामुळे या फार्स प्रकाराचे स्वरूप केवळ विनोदी न राहता गंभीर स्वरूपाचा सामाजिक उपदेश सांगण्याकडे ते वळले ! हे फार्स मुख्य नाटकानंतर केले जात. त्याचा कालावधी सुमारे अर्ध्या तासापासून तासभरापर्यंत असे. या फार्स प्रकाराने लोकमानसाचे रंजन तर झालेच, पण सामाजिक नाटकाच्या निर्मितीला एक पोषक वातावरणही तयार झाले. कारण


# रणांगण दिवाळी अंकात

¤ तेलंगणच्या वीर शेतकऱ्यांच्या सशस्त्र संघर्षाची रोमहर्षक वीर गाथा...

**निखारे अजून विझले नाहीत !**

¤ नागा-मिझोंच्या इतिहासाची – संस्कृतीची आणि सशस्त्र बंडाची खास अनिल बर्वे स्टाइलमध्ये अनिल बर्वे टच असलेला प्रदीर्घ लेख...

**झू, दाओ अन् चर्चबेल्स !**

¤ चिनी क्रांतीची चक्षुर्वैसज्यम हकीकत सांगणारी आणि ब्रिटिश सरकारने बेचाळीस साली जप्त केलेली एक पुस्तिका आम्ही पुनर्मुद्रीत करीत आहोत.

¤ डॉ. पंढरीनाथ रानडे यांच्या लेखणीतून उतरलेला एक नवा लेख.

**सह्याद्री - सातपुड्यातील हत्यारबंद बंडवाले !**

याव्यतिरिक्त ६ उत्कृष्ट लघुकथा, मनोरंजक माहितीपूर्ण लेख, हास्यचित्रे

**पृष्ठे सुमारे ११५ : प्रसिद्धि १५ ऑक्टोबर : किंमत ३ रुपये**

वार्षिक वर्गणी दहा रुपये. द्विवार्षिक वर्गणी दहा ऑक्टोबर पूर्वी भरणाऱ्यांना अनिल बर्वे लिखीत ' रोखलेल्या बंदुका, उठलेली जनता ' हे गाजलेले पुस्तक विनामूल्य भेट मिळेल. आजच आपली वर्गणी पाठवा—

कार्यालय : पाक्षिक रणांगण, ९८ क्लॉर्क रोड, जेकब सर्कल, मुंबई ११

सामाजिक नाटकाचे मूळ या फार्समध्येच सापडते.

फार्स सादर करणारी पहिली नाटक-कंपनी म्हणजे अमरचंद वाडीकर ही आहे. त्यांनी १९ जानेवारी १८५६ ला पहिला फार्स रंगभूमीवर आणला. या कंपनीची दोन वैशिष्टये होती; एक म्हणजे पौराणिक नाटकाच्या जोडीला फार्स सादर करणे आणि दुसरे म्हणजे पौराणिक नाटकात प्रथमच सीनसिनरीचा वापर करणे! पण या किंवा अन्य फार्स करणाऱ्या कंपन्यांनी केलेल्या प्रयोगांचे तपशील कोठेच मिळत नाहीत. त्यामुळे त्या प्रयोगांविषयी काहीच अंदाज बांधता येत नाहीत. अण्णासाहेब किर्लोस्करांची नाटके (शाकुंतल सौभद्र) रंगभूमीवर येऊ लागली आणि या फार्सांचे महत्त्व कमी झाले.

'गुलाबछकडीचा फार्स' हा गेल्या शतकातील एक उल्लेखनीय असा फार्स. एका धनवान म्हाताऱ्याची सौंदर्यवान तरुण पत्नी. तिच्या सौंदर्याने घायाळ झालेले आषक तिला प्रेमाने गुलाबछकडी म्हणत. नवऱ्याला तिच्या सौंदर्यामुळे आणि लोकप्रियतेमुळे चारित्र्याचा संशय येतो. तो संशय दूर करण्यासाठी ती एक युक्ती करते. एका जवाहर विकणाऱ्या व्यापाऱ्याकडून नवऱ्याला दाखवण्यासाठी डबा ठेवून घेते. दुसऱ्यादिवशी तो व्यापारी आल्यावर त्याला डबा न देता नोकरांकडून हाकलून लावते. तो व्यापारी पोलीस, न्यायाधीश, प्रधान, राजा सर्वांकडे फिर्याद करतो. प्रत्येकजण चौकशीसाठी येतो. ती प्रत्येकाला आपल्या सौंदर्याने, लाडिक बोलण्याने खेळवते. सारेच तिच्याकडे रात्रीच्या वेळी थोड्याफार अंतराने येतात. त्यातून अनेक गमतीचे प्रसंग घडतात. शेवटी ती आपला (चोरीचा) गुन्हा कबूल करते. राजा तिला बक्षीस देतो. कथा सुखांत होते.

या फार्सचे लेखन पूर्णतः विनोदी किंवा विडंबनात्मक नाही, तर काही भाग कथनाचा आहे. काही अतिशयोक्त स्वरूपाचा आहे. आज जी आपली फार्सबद्दलची कल्पना आहे, ती त्या काळात नव्हती. विनोदाच्या माध्यमातून समकालीन जीवनाच्या दर्शनाचा किंवा प्रवृत्ती दर्शनाचा भाग अपेक्षित होता. केवळ विनोदासाठी विनोद नव्हता. त्या विनोदाची-फार्सची निर्मिती सहेतुक होती. त्यामुळे हा फार्स त्याच्या लेखन काळाचे आणि निर्मितीच्या प्रयोजनाचे भान ठेवूनच पाहणे अगत्याचेआहे.

'कलोपासकाच्या कलाकारांनी या फार्समधली सोंगें हुबेहूब रंगविली होती. विशेषतः पोषाख, मेकप् आणि बोलण्याची पद्धती संहितेला न्याय देणारी वाटली. फार्समधली भाषा जुन्या काळातली असल्याने त्याचे कृत्रिमपण बोलायला आणि ऐकायलाही जड वाटणारे होते. पण कलाकारांनी ते कोठेही त्रासदायक होऊ दिले नाही. एक गोष्ट मात्र जाणवली, की या फार्सच्या विषय मांडणीचे किंवा एकूण लेखनाचे स्वरूप कृत्रिम, भडक असल्याने अभिनयातही तीच पद्धती अपेक्षित होती. कारण प्रत्येक नाट्यसंहितेची

विशिष्ट प्रकारच्या अभिनयाची मागणी असते. ती दुर्लक्षून संहितेतील आशयापर्यंत जाणे एक तर अशक्य असते आणि शक्य झाले तरी अन्यायाचे असते. त्या दृष्टीने संयत अभिनयाची गरज या नाट्यसंहितेला नव्हती. दुसरी गोष्ट म्हणजे एकूण पात्रांच्या संख्येच्या मानाने रंगमंच अपुरा होता. आणखी मोठा रंगमंच या फार्सला लाभेल तर प्रयोगाचे जिवंतपण अधिक वाढेल.

सुमारे शंभर-सव्वाशे वर्षापूर्वीचा फार्स करून दिग्दर्शक राजा नातू आणि त्यांचे सहकारी कलाकार यांनी 'प्रयोग' उपक्रमात खऱ्या अर्थाने 'प्रयोग' केला, याबद्दल त्यांचे अभिनंदन. अतिवास्तववतेच्या, न-नाट्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या तरुण कलाकारांना पगडी, उपरणे, धोतर, बाराबंदी, पायात जोडा अशा थाटात पाहताना गंमत वाटत होती. नेहमीची तुटक, निसटती, स्वैर स्वरूपाची भाषा बोलणारे हे कलावंत खास ग्रांथिक शब्द प्रयासाने बोलताना पाहून वेगळे वाटत होते. एका अर्थाने हे एक नाट्यशिक्षणच आहे. परंपरा आणि नवता यांचे भान 'प्रयोग' उपक्रमात राखले जात आहे. त्यामुळेच या उपक्रमाविषयीचे कुतूहल अधिक वाढणारे आहे. हा फार्स पाहताना जुन्या काळच्या रंगभूमीचे ओझरते का होईना दर्शन घडले. (संगीत नाटकाचा रंगमंच नसताना) मुक्त रंगमंचावर वातावरण निर्मितीसाठी म्हटलेली 'पंचतुंड नररुंड मालधर' ही नांदी ऐकावयास मिळाली. (कालदृष्टचा ही नांदी जेव्हा मराठी रंगभूमीवर म्हटली गेली, तेव्हा फार्स हा प्रकार रंगभूमीवरून अस्तंगत होत होता.)

या फार्समध्ये अनेक कलाकार होते. त्यामध्ये आपापल्या वैशिष्ट्यांनी लक्षात राहिले ते म्हणजे माधव वझे, अरुण शिंदे, धनंजय गोळे, अनिल गाडगीळ, श्याम जोशी, मधू जोशी, ज्योती मोघे आणि शरश्चंद्र कलावंत!

—वि. भा. देशपांडे

---


# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**


---

## हिन्दी चित्रपट

# जैसे को तैसा

मद्रासच्या ए. व्ही. एम्. चित्रसंस्थेचा हा नवा चित्रपट. 'राम और श्याम', 'सीता और गीता', 'राजा और रंक' या चित्रपटांच्या साच्यातलाच हा एक नवा चित्रपट. कथानकात नाविन्य कसलेही नाही. त्या जुन्या फॉर्म्युल्याचीच ही चक्क कार्बन-कॉपी आहे. 'राम और श्याम'सारखे चित्रपट यशस्वी झाल्यानंतर त्याच साच्याचे नवे चित्रपट काढण्याचा, त्यांची भ्रष्ट नक्कल करण्याचा मार्ग आता मद्रासी चित्रनिर्मात्यांनीही स्वीकारला आहे. खास मद्रासी मसाल्याने परिपूर्ण असा हा चित्रपट. 'राम और श्याम' चीच कथा – पण थोडी अधिक हलकी-फुलकी. वेगळेपण इतकेच की कथानकाला फार्सिकल ट्रीटमेंट दिली आहे. ठरीव साच्यातील पण तपशीलात फरक असलेली कथा – परंतु मूळ सूत्र एकच.

चेहऱ्यात विलक्षण साम्य असलेले दोन तरुण – एक श्रीमंत पण अत्यंत शांत स्वभावाचा, खरं तर नेभळट; तर दुसरा गरीब परंतु धाडसी, तडफदार. गरीब स्वभावाच्या विनोदला त्याचे मामा आणि मामेभाऊ 'पाशी' खूप छळतात. त्याला मारहाण करतात. विनोदच्या वडिलार्जित संपत्तीचे रहस्य ज्या डायरीत असते, ती डायरी हस्तगत करण्यासाठी खलनायक पाशी (रमेश देव) हे सारे कारस्थान करतो. हुबेहूब विनोदसारखा दिसणारा विजय, विनोद बनून त्याच्या घरी येतो आणि विनोद विजय होऊन त्याच्या आई आणि बहिणीसमवेत राहू लागतो. विनोद बनलेला विजय पाशीला खूप पिटतो. त्याला योग्य धडा शिकवतो. या दरम्यानच त्याचे अल्लड ग्रामकन्या रूपावर प्रेम जडते. रूपादेखील विजयला चांगलीच मदत करते. म्हणजे ती गुंडांशीदेखील चार हात करते. नायिकेचे हे रूप मोठे विलक्षण. विजय विनोदच्या पाशीने लपवून ठेवलेल्या प्रेयसीलाही शोधून काढतो आणि अखेर सर्वांचे मधुर मीलन.

जावर एन्. सीतारामन् यांची ही कथा. पटकथालेखक जी. नारायणदास यांनी अशाच प्रकारच्या इतर चित्रपटातील काही नेमके कौशल्याने उचलले आहे. पंडित मुखराम शर्मा यापेक्षाही चांगले संवाद लिहू शकतात. फाइट कंपोजर के. के. रत्नम् यांची कामगिरी मात्र उल्लेखनीय आहे. क्लायमॅक्सच्या दीर्घ मारामारीच्या प्रसंगात त्यांनी कल्पकता दाखवली आहे. 'जैसे को तैसा मिला कैसा मजा आया' या गाण्यातून चित्रित केलेला हाणामारीचा खलनायकाला हंटरने फोडून काढणारा, नायक गाण्याच्या ठेक्यावर नाचत नाचत फटके मारीत असतो. हा प्रसंग मोठा मजेदार. जितेन्द्रशिवाय इतर कुणाला असे नाचत नाचत मारामारी करणे जमले नसते. असा हा साराच प्रकार अतिरंजित. एम्. मुरुगन् आणि एम्. कुमरन् या दिग्दर्शकद्वयांनी आपले

कौशल्य यातच दाखवले आहे. – चित्रपट गतिमान, मेलोड्रॅमॅटिक बनवण्यात. राहुलदेव बर्मन यांच्या संगीतात नवीन काही नाही. ' चलते चलते पीछे मुडके देख जरा ' आणि ' कौनसी वो चीज जो यहाँ नहीं मिलती ' ही गाणी बरी आहेत. छायाचित्रण मात्र आकर्षक आहे. काही ट्रिकसीन्स चांगले टिपले आहेत.

विनोद आणि विजय अशी दुहेरी भूमिका (डबलरोल) करण्याची संधी जितेन्द्रला या चित्रपटात मिळाली. परंतु दिलीपकुमार (राम और श्याम) आणि हेमामालिनी (सीता और गीता) यांच्या तुलनेने जितेन्द्रचा अजिबात प्रभाव पडला नाही. त्याचा अभिनय बेताचाच. विशेष वाव नसतानादेखील रीना राय मात्र आकर्षक वाटली. अल्लड ग्रामकन्येची भूमिका तिने सुरेख वठविली.

रंगरूपाने साधारण अशी ही रीना राय काही वर्षे चित्रसृष्टीत एक्स्ट्राच्या रूपात वावरत होती. नायिका म्हणून पडद्यावर प्रथम ती आली बी. आर. इशारांच्या ' जरूरत 'मध्ये. मॅट्रिकपर्यंत शिकलेली आणि कथ्थक व कॅबेरे नृत्यात पारंगत अशी ही रीना आजपर्यंत ' जंगलमे मंगल ', ' मिलाप ' या चित्रपटांतून प्रेक्षकांसमोर आली आहे. ' सोसायटी ', ' अंधी जवानी ' या आगामी चित्रपटात ती नायिका आहे. ग्लॅमरगर्ल बनण्याऐवजी चांगली अभिनेत्री होण्याची तिची इच्छा आहे. संधी मिळाली तर ती चांगली चमकेल.

खलनायक पाशीची भूमिका रमेश देवने ठीक वठवली आहे. श्रीविद्या या नवोदित नटीने विनोदची प्रेयसी ठीक रंगविली आहे. इतर कलाकारांमध्ये मोहन चोटी, दिनेश हिंगू, कामिनी कौशल, अन्वर हुसेन आपापल्या भूमिका व्यवस्थित वठवतात. रोजा रमणी ही विनोदची बहीण झालेली चिमुरडी पोरगी गोड आहे.

सुजाण, रसिक प्रेक्षकाला रस वाटावा असे या चित्रपटात काहीही नाही !

—सुभाष नाईक

---

## सलीम—जावेद

अधिकार, अंदाज, हाथी मेरे साथी, सीता और गीता, जंजीर हे अलीकडे खूप यशस्वी ठरलेले काही चित्रपट. या चित्रपटांच्या कथा सलीम—जावेद यांच्या. सलीम-जावेद हे हिंदी चित्रसृष्टीतील इतर जोडगोळ्यांप्रमाणे वेगवेगळ्या कामासाठी मुंबईला आले. मुंबईत दोघांची गट्टी जमली आणि ते एकत्र येऊन काम करू लागले.

दोघेही मूळचे मध्यप्रदेशातले. सलीम इंदूरचा तर जावेद ग्वाल्हेरचा. १९५८ साली सलीम प्रथम अभिनेता होण्याच्या ईर्ष्येने मुंबईला आला तर दिग्दर्शक होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून जावेदने मुंबईत पायपीट केली. आपले ध्येय गाठण्यासाठी दोघांनीही पराकाष्ठा केली. खूप खटपट केली. त्यांना कामे मिळाली पण लवकरच त्यांच्या हे लक्षात आले की, ' हे काही खरे नाही. '

दोघांनी मिळून एकत्र येऊन सर्वप्रथम सॅण्डो चिन्नप्पा देवर यांच्यासाठी ' हाथी मेरे साथी 'चे काम हाती घेतले. चित्रपट गाजला आणि त्यांच्यापुढे यशाचे दालन खुले झाले.

सध्या दोघेही एकत्र बसून पटकथा-लेखन करतात. आणि पटकथालेखकांमध्ये आज त्यांचे भाव सर्वांत तगडे आहेत.

ज्योत्स्ना देवधर
सादर करीत आहेत

आत्मकथा

एका
कैद्याची

# माणूस
दिवाळी अंक

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649


एका माथेफिरूच्या
बंदुकीतून सुटणारी गोळी
इतिहासाचा प्रवाह
बदलू पहात होती–
पण....

एका राष्ट्रप्रमुखाला
ठार करण्यासाठी
आखण्यात आलेला
पद्धतशीर कट–
प्रत्येक प्रसंग
अंगावर रोमांच उभे करणारा;
कल्पनेतही अशक्य वाटावी
अशी वास्तव घटना.

**सारेच काही गूढ**
**सारेच काही अजब**

साऱ्या जगभर खळबळ
निर्माण करणाऱ्या आणि
विक्रीचा विक्रम प्रस्थापित
करणाऱ्या एका विलक्षण
कादंबरीचा परिचय

**माणूस–चित्र वार्ता पुस्तक दिवाळी अंकामध्ये**